वर्ष ५८ वे । अंक १३९ । पृष्ठे ६। किंमत २ रूपये। **मंगळवार, ९ डिसेंबर २०२५**

PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026 dainiksatyaprabha2015@gmail.com dainik_satyaprabha epaper.satyaprabha.com

दैनिक **सत्यप्रभा** बातम्यांसोबत विचार देणारे

### अमेडिया प्रकरणात अधिकाऱ्यास अटक

*पुणे: उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने खरेदी केलेल्या मुंढवा येथील ४० हेक्टर जागेच्या खरेदी-विक्री घोटाळा प्रकरणात दस्त नोंदणी करणाऱ्या सह दुय्यम निबंधक रवींद्र बाळकृष्ण तारू यांना बावधन पोलिसांनी रविवारी अटक केली. त्यांना पौड येथील न्यायालयाने १५ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. दरम्यान, कुलमुखत्यारधारक शीतल तेजवाणी पोलीस कोठडीत आहे.*

### स्वातंत्र्यसैनिकाची बांगलादेशात हत्या

*ढाका : बांगलादेशातील उत्तर रंगपूर जिल्ह्यातील कुर्शा भागात ७५ वर्षीय स्वातंत्र्यसेनानी आणि त्यांच्या पत्नीची गळा चिरून हत्या करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. जोगेश चंद्र रॉय आणि सुबोर्ना रॉय, अशी त्यांची नावे आहेत. त्यांनी रविवारी सकाळी दरवाजा उघडला नसल्याने शेजाऱ्यांनी शिडी लावून घरात प्रवेश केल्यानंतर हा प्रकार उघड झाला. दोन्ही मुलगे पोलीस अधिकारी असूनही अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.*

# मुंबई-नांदेड-मुंबई विमानसेवा २५ डिसेंबरपासून, स्टार एअरकडून तिकिट बुकिंग सुरू

प्रतिनिधी। **नांदेड**

नांदेड-मुंबई बहूप्रतिक्षित विमानसेवेचा २५ डिसेंबरपासून शुभारंभ होणार असून, स्टार एअर कंपनीने तिकिट विक्रीही सुरू केली आहे. खा. अशोकराव चव्हाण यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे हे यश आहे.

मुंबई - नांदेड - मुंबई ही विमानसेवा तूर्तास मंगळवार, गुरुवार आणि शनिवार असे तीन दिवस उपलब्ध असेल. मात्र, लवकरच ती सेवा दररोज सुरु होणार आहे. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावरून दुपारी ४.२५ वाजता विमानाचे उड्डाण होऊन सायंकाळी ५.४० वाजता ते नांदेडच्या श्री गुरु गोबिंदसिंघजी विमानतळावर उतरेल. परतीच्या प्रवासासाठी हे विमान सायंकाळी ६.१० वाजता उड्डाण करून रात्री ७.२५ वाजता मुंबईला पोहोचेल.

ही विमानसेवा १५ नोव्हेंबरपासून नियोजित होते. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे त्यास विलंब झाला. दरम्यानच्या काळात माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी सदरहू तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला. नांदेड-मुंबई विमानसेवेला मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावरच स्लॉट मिळावा, यासाठी देखील ते सातत्याने आग्रही राहिले.

खा. अशोकराव चव्हाण यांच्या प्रयत्नांना यश या विमान सेवेमुळे नांदेड जिल्ह्यासह हिंगोली, परभणी, लातूर, वाशिम, हिंगोली अशा अनेक जिल्ह्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. नांदेडहून मुंबईसाठी थेट विमानसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री के. राममोहन नायडू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मोलाचे सहकार्य केल्याचे खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.



**तिरूपती, शिर्डीसाठीही प्रयत्न**

पुढील काळात नांदेडहून तिरूपती, शिर्डी , कोल्हापूर आणि गोवासाठी थेट विमानसेवा सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे. नांदेडच्या सर्वांगीण विकासासाठी रस्ते, रेल्वे आणि हवाई वाहतूक यांसंबंधी पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या स्तरावर विविध मागण्या मांडल्या असून त्यांचा पाठपुरावा सुरू असल्याने देशभर नांदेडची कनेक्टिव्हिटी वाढेल असा नांदेकरांना विश्वास आहे.

#### खा. अशोकराव चव्हाण यांच्या प्रयत्नांना यश

या विमान सेवेमुळे नांदेड जिल्ह्यासह हिंगोली, परभणी, लातूर, वाशिम, हिंगोली अशा अनेक जिल्ह्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. नांदेडहून मुंबईसाठी थेट विमानसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री के. राममोहन नायडू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मोलाचे सहकार्य केल्याचे खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले असून त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित आहे.

#### नांदेडसह लगतच्या जिल्ह्यांनाही लाभ

या दोन्ही विमानसेवेमुळे नांदेडसह परभणी, हिंगोली आणि लातूर जिल्ह्यातील प्रवाशांना सोयीस्कर विमानसेवा मिळणार आहेत. विशेषतः मुंबईसाठी थेट विमानसेवा सुरू झाल्याने व्यावसायिक प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. सध्या नांदेडहून दिल्ली (हिंडन), अहमदाबाद, पुणे, बंगळुरू आणि हैद्राबाद या पाच शहरांसाठी विमानसेवा सुरू आहेत. आता आणखी एक मुंबई विमानसेवा सुरु होणार आहे

## राजनिती

### पुतीन यांच्यानंतर झेलेन्स्की दौऱ्यावर?



**नवी दिल्ली** : रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतीन हे नुकतेच दोन दिवसाच्या भारत दौऱ्यावर आले होते. या दौऱ्याच्या माध्यामातून रशिया आणि भारतानं जगाला अनेक अप्रत्यक्ष संदेश दिले होते. आता भारतानं अजून एक कुटनैतिक चाल खेळण्याचा निर्णय घेतला आहे. युक्रेनचे राष्ट्रपती ब्लादिमीर झेलेन्स्की यांनी देखील भारत दौरा करावा यासाठी भारत प्रयत्न करत आहे. कुटनैतिक विश्वात भारताचा हा समतोल साधण्याचा प्रयत्न म्हणून याकडे पाहिले जात आहे.

## संक्षिप्त

### तुकाराम मुंढेंच्या विरोधात लक्षवेधी?

**नागपूर** : सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांना निलंबित करण्यासाठी भाजपचे दोन आमदार सरसावले आहेत. हे आमदार त्याबद्दल विधानसभा अधिवेशनात विशेष लक्षवेधी सूचना मांडणार आहेत. ही माहिती आमदार कृष्णा खोपडे यांनी एबीपी माझा या वृत्तवाहिनीसोबत बोलताना दिली. नागपूर मनपाचे सात महिने आयुक्त असताना स्मार्ट सिटी प्रकल्पात ढवळाढवळ केली. नियमबाह्य पद्धतीने एका कंत्राटदाराला २० कोटी रुपयांचा धनादेश दिला होता.

### कर्जदार शेतकऱ्यांची माहिती मागवली

**अहिल्यानगर** : राज्य सरकारच्या सहकार व पणन विभागाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसह राष्ट्रीयकृत बँकांकडून थकबाकीदार शेतकऱ्यांची इतंभूत माहिती मागवली आहे. असे पत्र प्राप्त झाले आहे, त्यानुसार माहिती संकलनास सुरुवात करण्यात आल्याचे येथील जिल्हा बँकेकडून सांगण्यात आले. मात्र ही माहिती कर्जमाफीसाठी की अन्य उपाययोजनांसाठी याबद्दल चर्चा होत आहे.

### पदवीधर मतदारांना नोंदणीचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर** : भारत निवडणूक आयोगाने घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघाची प्रारुप मतदार यादी दि. ३ डिसेंबर रोजी प्रसिध्दी झालेली आहे. सदर यादीवर दिनांक ३ डिसेंबर ते १८डिसेंबर या कालावधीत दावे व हरकती स्विकारण्यात येणार आहेत व त्यासाठी मतदान केंद्रनिहाय पदनिर्देशीत अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत.

### गोदावरी मराठवाडा महामंडळ स्वायत्त

**छत्रपती संभाजीनगर** : जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळासह कृष्णा खोरे विकास महामंडळाला १ एप्रिल २०२६ पासून स्वायत्त करण्याच्या निर्णय शासनाने घेतला आहे. याअनुषंगाने पहिली बैठक १२ डिसेंबर रोजी नागपुरात आयोजित करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ सूत्राने दिली. महामंडळे स्वायत्त झाल्यास मंडळाचा सर्व खर्च स्वत:च्या उत्पन्नातूनच भागवावा लागणार आहे. महामंडळाकडून धरणे बांधणे आणि त्यांचे व्यवस्थापन करण्यात येते.


### वंदे मातरम्‌वरील चर्चेदरम्यान पीएम मोदींचा घणाघात

# जिनांच्या दबावापुढे राष्ट्रीय काँग्रेसने गुडघे टेकले होते

वृत्तसंस्था। **नवी दिल्ली**

वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आज यावर विशेष चर्चा सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आपल्या भाषणातून या चर्चेला सुरुवात केली. यादरम्यान ते म्हणाले की, देशवासीयांना अभिमान वाटला पाहिजे. जगाच्या इतिहासात अशी कविता किंवा असे कोणतेही भावनिक गाणे असू शकत नाही, ज्याने शतकानुशतके लाखो लोकांना एकाच ध्येयासाठी प्रेरित केले.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, लंडनच्या इंडिया हाऊसमध्ये वीर सावरकरांनी 'वंदे मातरम्' गायले. या नावाने वृत्तपत्रे काढली गेली, ज्यावर ब्रिटिशांनी बंदी घातली होती. भीकाजी कामांनी पॅरिसमध्ये 'वंदे मातरम्' नावाचे वृत्तपत्र सुरू केले. या गीताने देशात स्वावलंबनाची भावना रुजवली. लहान मुलेही प्रभातफेरी काढत 'वंदे मातरम्'चा जयघोष करत. त्यांना तुरुंगात डांबले जायचे, चाबकाचे फटके मारले जायचे. बंगालच्या गल्लींमधून उठलेली ही आवाज अखेर संपूर्ण देशाचा आवाज बनली.''पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, वंदे मातरमसोबत विश्वासघात का झाला? त्यावर अन्याय का झाला? कोणत्या शक्तीने वंदे मातरम सारख्या पवित्र गीताला वादांच्या भोवऱ्यात ढकलले? नवीन पिढीला हा इतिहास सांगितलाच पाहिजे. काँग्रेसने वंदे मातरमचे तुकडे केले. तुष्टीकरणाचे राजकारण करण्याचा हा त्यांचा मार्ग होता. त्यामुळेच काँग्रेसला भारताच्या फाळणीलाही बळी पडावे लागले. काँग्रेस ज्यांच्याशी संबंधित आहे, ते वंदे मातरमवरून तीव्र वाद निर्माण करतात. इतिहास साक्षी आहे की, काँग्रेस मुस्लिम लीगला शरण गेली असल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करत काँग्रेसवर तोफ डागली.



**वंदे मातरमची केली होती चौकशी सुरु**

१५ ऑक्टोबर १९३६ रोजी लखनौमधून मोहम्मद अली जिनांनी वंदे मातरमच्या विरोधात घोषणाबाजी केली. काँग्रेस पक्षाचे तत्कालीन अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांना त्यांचे सिंहासन धोक्यात असल्याचे दिसले. त्यामुळे मुस्लिम लीगच्या निराधार विधानांचा तीव्र निषेध करण्याऐवजी, नेहरुंनी वंदे मातरमचीच चौकशी सुरू केली. नेहरू म्हणाले होते की, वंदे मातरमची पार्श्वभूमी मी वाचली आहे आणि त्यामुळे मुस्लीम समाज अस्वस्थ होऊ शकतो. त्यानंतर काँग्रेसने जाहीर केले की, २६ ऑक्टोबरला कोलकाता येथील बैठकीत वंदे मातरमच्या वापराचा आढावा घेतला जाईल.

### जपानमध्ये भूकंप; त्सुनामीचा इशारा

वृत्तसंस्था। **टोकियो**

जपानच्या उत्तरपूर्व किनाऱ्यालगत ८ डिसेंबरच्या संध्याकाळी ७.६ तीव्रतेच्या भूकंप झाला. यानंतर जपान मेट्रोलॉजिकल एजन्सीने त्सुनामीचा इशारा जारी केला आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदू आमोरीपासून सुमारे ४० किलोमिटर अंतरावर समुद्रात आहे. भूकंपानंतर काही बंदरांवर २० ते ५० सेंटीमीटर उंचीच्या दिसून आल्या. मात्र शासकीय अधिकाऱ्यांनी काही काळानंतर तीन मीटरपर्यंत उंच लाटा येऊ शकतात, असे सांगितले. त्यामुळे किनाऱ्यालगतच्या नागरिकांनी उंचावर किंवा सुरक्षित केंद्रांत स्थलांतर करावे, असे निर्देश दिले आहेत. भूकंपानंतर तारा तुटून अनेक भागांत वीजपुरवठा खंडित झाला आहे. रेल्वेसह काही वाहतूक सेवा तात्पुरत्या थांबविण्यात आल्या आहेत. अद्याप नुकसानाची अंदाज आला नसून आढावा घेणे सुरू आहे. सरकारने परिसरातील न्यूक्लियर प्लांट्सची तपासणी सुरू केली आहे. जपनाच्या पंतप्रधानांनी तातडीने मदत कार्य सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शासकीय अधिकाऱ्यांनी सुरक्षा व मदत पथके स्थापन केली आहेत.

# कष्टकरी, कामगारांचे नेते डॉ. आढाव कालवश

### वयाच्या ९६ व्या वर्षी पुण्यात घेतला अखेरचा श्वास

वृत्तसंस्था । **पुणे**

ज्येष्ठ समाजसेवक, कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा आढाव यांनी सोमवारी रात्री ८.२५ वाजता अखेरचा श्वास घेतला. त्यांच्यावर गेल्या १२ दिवसांपासून पूना हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात उपचार करण्यात येत होते. मृत्युसमयी ते ९६ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रीतील कष्टकरी, श्रमिक जनतेमध्ये पोरकेपणाची भावना निर्माण झाली आहे.



डॉ. बाबा आढाव यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांच्यावर उपचार करण्यात येत असल्याची माहिती समजल्यानंतर महाराष्ट्राच्या विविध भागातून कार्यकर्त्यांचे लोंढे पुण्यात दाखल होत होते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनी पान २ वर

### 'एक गाव एक पाणवठा'चे प्रणेते

त्यांचे संपूर्ण नाव डॉ. बाबासाहेब पांडुरंग आढाव, असे होते. त्यांचा जन्म १ जून १९३० रोजी झाला होता. ते आयुर्वेदाचे डॉक्टर होते. बालपणीच राष्ट्र सेवा दलात दाखल झालेल्या बाबा आढाव यांनी हमाल पंचायत स्थापन करून राज्यातील कष्टकऱ्यांच्या संघटना बांधल्या व त्यांच्या मागण्यांना न्याय मिळवून दिला. गेल्या पन्नास वर्षात त्यांनी सत्यशोधक समाजाचे संघटन मजबूत केले. महात्मा फुले यांच्या पुण्यातील वाडा व सावित्रीबाई फुले यांचे सातारा जिल्ह्यातील राष्ट्रीय स्मारक निर्माण करण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला. जातीय भेदभावाविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी एक गाव एक पाणवठा या क्रांतिकारी चळवळीचे नेतृत्व केले आणि समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. बाबा आढाव यांनी समाजवादी पक्षाचे काम सोडून कामगारांसाठी झोकून दिले. कष्टाची भाकर ही संकल्पना त्यांचीच होती.

# हिवाळी अधिवेशनात ७५ हजार २८६ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

वृत्तसंस्था। **नागपूर**

राज्य सरकारने ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या विधिमंडळात सोमवारी सादर केल्या आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज या लोकप्रिय घोषणांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, विविध कामे, योजना व प्रकल्पांवरील खर्चात झालेली वाढ, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना अर्थसाह्य, नाशिकचा कुंभमेळा आदींमुळे सरकारच्या खर्चात वाढ झाल्याने या पुरवणी मागण्या विधिमंडळात सादर करण्यात आल्या आहेत.

राज्याची आर्थिक स्थिती अडचणीची आहे, पण दिवाळखोरीकडे वाटचाल नाही आणि वित्तीय निकषांचे पालन करण्यात येत आहे, असे परखड प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना केले होते. यंदा पावसाळी अधिवेशनातही जून २०२५ मध्ये ५७ हजार ५५० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या होत्या. मात्र अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने सुमारे ३१ हजार ५०० कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केल्याने खर्चात वाढ झाली आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना अर्थसहाय्य, बियाणे व अन्य कामांसाठी सुमारे १५ हजार ६४८ कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. पान २ वर

**अतिवृष्टीबाधितांच्या मदतीचा आर्थिक भार**

अतिवृष्टीमुळे बाधित शेतकरी व इतरांसाठी सुमारे ३१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे. त्यापैकी ९० लाखाहून अधिक शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळाली आहे. उर्वरित शेतकऱ्यांना पीक नुकसान भरपाईसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. शेतकऱ्यांना बियाणे, खते व अन्य सामग्रीसाठी नऊ हजार ६०० कोटी रुपये, खरडून गेलेल्या शेतजमिनी पूर्ववत करण्यासाठी ११८ कोटी, आपत्तीनिवारणाच्या विविध कामांसाठी ६०० कोटी, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीसाठी २५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

### कत्तलीचा कट उधळला; पाच गोवंशीय जनावरांची सुटका

प्रतिनिधी। **नांदेड**

जिल्ह्यात वाढत्या अवैध गोवंश वाहतुकीवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिसांनी शुक्रवारी पहाटे मोठी कारवाई केली. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या पथकाने बोंडार परिसरात सापळा रचून बोलेरो पिकअपसह पाच गोवंशीय जनावरे जप्त केली. या कारवाईत एकूण ९ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, संबंधित आरोपीला अटक करण्यात आली आहे.'शहरात ७ डिसेंबरच्या मध्यरात्री उपनिरीक्षक नागनाथ तुकडे आणि त्यांचे पथक नांदेड शहरात गस्त घालत होते. यावेळी गुप्त माहितीदारामार्फत पान २ वर

# 'विष्णुपुरी'तून रब्बी हंगामासाठी दोन पाणीपाळ्याचे नियोजन

प्रतिनिधी। **नांदेड**

शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पातून रब्बी हंगामासाठी दोन पाणीपाळ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. पिकांसाठी ज्यांना पाणी घ्यावयाचे आहे त्यांनी पाणी मागणी अर्ज विहीत नमुन्यात बुधवारपूर्वी (ता. १०) संबंधित शाखा कार्यालयात माहिती भरून सादर करावी, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभागाच्या (उत्तर) कार्यकारी अभियंत्यांनी केले आहे.

या वर्षी प्रकल्पावरील कालवा सल्लागार समितीची बैठक अद्याप झाली नसल्याने आगामी कालवा सल्लागार समितीच्या बैठकित होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून १५ ऑक्टोबर रोजीच्या शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पातील (८०.७९ दलघमी) १०० टक्के इतक्या जिवंत पाणीसाठ्यावर आधारित उपलब्ध पाणीसाठ्यातून पिण्यासाठीचे पाणी राखीव ठेऊन रब्बी हंगामात दोन पाणीपाळ्या देण्याचे नियोजित आहे.प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील लाभधारकांना अधिसुचित नदी-नाल्यावरील तसेच मुख्य कालव्यावरील प्रवाही व कालवा उपसा सिंचन योजना धारकांनी रब्बी हंगामातील उभी पिके व चारा पिके या पिकांसाठी कालव्याचे प्रवाही, कालव्यावरील उपसा, नदी-नाल्यावरील मंजूर उपसा सिंचन योजनेद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यायचे असल्यास मागणी अर्ज भरून समवेत थकित पाणीपट्टी व चालू हंगामाची अग्रिम रक्कम भरण्यात यावी तरच पान २ वर

### जिल्हा परिषदेचा मद्यपी शिक्षक निलंबित

प्रतिनिधी । **नांदेड**


जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या वर्गातच दारूच्या नशेत तर्रर होवून आणि विक्षिप्त हावभाव करत गोंधळ घालणाऱ्या शिक्षकास सेवेतून निलंबित करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी आज सोमवारी (दि.८) निर्गमित केले आहेत. याप्रकरणी अधिक माहिती अशी की,माहूर तालुक्यातील शेकापुर येथील जि.प.के.प्रा.शाळेतील शिक्षक अनंत रामचरण वर्मा यांनी मद्यधुंद अवस्थेत विक्षिप्त हावभाव करत डान्स करीत असल्याचा एक व्हिडिओ दि.५ डिसेंबर रोजी सोशल मीडियावरून व्हायरल झाला होता. त्यामुळे या प्रकाराबद्दल सगळीकडे खुमासदार चर्चेबरोबरच शिक्षण विभागाच्या पान २ वर

**खुशखबर** फळपिकाला ४ कोटी ४८ लाख ५३ हजार मंजूर

# केळी, आंब्याला हवामान आधारित विमा परतावा

प्रतिनिधी। **नांदेड**

जिल्ह्यात पुनर्रचित हवामान आधारित आंबिया बहरातील केळी, आंबा या फळपिकाला चार कोटी ४८ लाख ५३ हजार ५२४ विमा परतावा मंजूर झाला आहे. केळी व आंबा उत्पादकांना जिल्ह्यात यंदा तापमानातील अनियमित बदल आणि हवामानातील चढ-उतारामुळे फळपिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसला होता. विमा मंजुरीमुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. परंतु बारड मंडलातील केळीला उच्च तापमानाचा ट्रिगर लागू झाला नसल्याची माहिती मिळाली.



**बारड मंडळात ७४ हजार मंजूर**

बारड मंडलात केळीसाठी हेक्टरी ३२ हजार १७९ विमा परतावा मंजूर झाला. तर अर्धापूर मंडल, नांदेड ग्रामीण मंडल, तुप्पा मंडल व विष्णुपुरी मंडलात केळीसाठी हेक्टरी ४२ हजार ५०० रुपये विमा परतावा मंजूर झाला आहे. हवामान आधारित विमा परतावा मिळावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. अखेर केळी, आंब्याला विमा परतावा मंजूर झाल्याचे फळपीक उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

जिल्ह्यात पुनर्रचित हवामान आधारित आंबिया बहरातील केळी, आंबा या फळपिकासाठी १८ महसूल मंडलांत विमा योजना राबविण्यात आली. यात आंबा फळपिकांसाठी अर्धापूर तालुक्यातील अर्धापूर मंडल, भोकर मंडलात भोसी, मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद व नांदेड तालुक्यातील लिंबगाव मंडलात १३ अर्जदार शेतकऱ्यांनी १५.६५ हेक्टरसाठी विमा भरण्यात आला होता.यात जास्त पाऊस व जास्त तापमान या घटकाअंतर्गत परतावा मंजूर करण्यात आला. यासाठी शेतकऱ्यांना १४ लाख २८ हजार ९३५ रुपयांचा परतावा मंजूर झाला आहे.

### २१ डिसेंबरची 'एमपीएससी' परीक्षा आता ४ जानेवारीला

वृत्तसंस्था। **मुंबई**

नगरपालिका आणि नगर पंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबरला होणार असल्याने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे या दिवशी घेण्यात येणारी महाराष्ट्र गट 'ब' अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही परीक्षा ४ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. या परीक्षेची तयारी व ती पार पाडण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी आणि महसूल विभागाकडे असते. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांसह महसूल विभागातील सर्व कर्मचारी हे २१ डिसेंबरला मतमोजणीत व्यस्त राहणार आहे. पान २ वर

# 'शिंदेचे आमदार घेऊन काय करू, ते आमचेच'

### मुख्यमंत्र्यांनी काढली आदित्य ठाकरेंच्या आरोपातील हवा

वृत्तसंस्था। **नागपूर**

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरूवात झाली असून सत्ताधारी व विरोधकांमध्ये आरोपाच्या फैरी झडत आहेत. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच आमदार आदित्य ठाकरे यांनी केलेल्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. त्यावर शिंदेच्या शिवसेनेचे आमदार भाजपात घेऊन काय करायचे, ते आमचेच आहेत, असे उत्तर देऊन ठाकरेंच्या आरोपातील हवाच काढून टाकली. 'एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे २२ आमदार भाजपाच्या गळाला लागले आहेत', असे वक्तव्य आदित्य ठाकरे यांनी केले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात पान २ वर

#### आदित्य ठाकरेंना चिमटा

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आता उद्या असे कोणीही म्हणू शकेल की, आदित्य ठाकरे यांचे जे २० आमदार आहेत, तेही भाजपाच्या गळाला लागले आहेत. असे कोणाच्या म्हणण्याने थोडेच काही होते, असा चिमटा त्यांनी काढला.

## संक्षिप्त

### ध्वजदिन निधी संकलनास प्रारंभ

**नागपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ करण्यात आला. शहिदांच्या कुटुंबियांना आधार देण्यासाठी शासनाच्यावतीने २५ लाख रुपये देण्यात येत होते. यामध्ये ४ पटीने वाढ करण्यात येऊन एक कोटी रुपये करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. यावेळी माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल उपस्थित होते.

### संत जगनाडे यांना पवारांचे अभिवादन

**नागपूर :** संत जगनाडे महाराज यांच्या जयंतीदिनानिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथील 'विजयगड' या शासकीय निवासस्थानी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, संत जगनाडे महाराज हे समाजप्रबोधनाचे ध्वजवाहक आणि संत परंपरेतील अढळ श्रद्धास्थान असणारे संत होते. संत जगनाडे महाराजांचे कार्य प्रेरणेचा अखंड दीपस्तंभ आहे.

### 'लोकराज्य'चे अंक डिजिटल स्वरुपात

**नागपूर :** राज्य शासनाचे 'लोकराज्य' या मासिकाचे दुर्मिळ अंक आता डिजिटल स्वरुपतात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ते लवकरच गुगल व इतर प्लॅटफॉर्मद्वारे वाचक व अभ्यासकांपर्यंत पोहोचवू, अशी माहिती माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी दिली. हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने 'लोकराज्य' च्या दुर्मीळ अंकाच्या प्रदर्शनाचे उद्घाटन व पहिल्या टप्प्यात ५० दुर्मिळ अंकाचे लोकार्पण त्यांच्या हस्ते करण्यात आले.

### राष्ट्रवादीच्या नेत्या हिंगेंचा अपघाती मृत्यू

**गडचिरोली :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष गीता हिंगे-पोरेड्डीवार (वय ५४) यांचे रविवारी मध्यरात्री साडेबारा वाजता नागपूर-उमरेड मार्गावरील पाचगावजवळ कार अपघातात निधन झाले. त्या पती सुशील हिंगे यांच्यासमवेत नागपूरहून परत येत होत्या. नागपूरकडे जाणाऱ्या भरधाव कारने रस्ता दुभाजक ओलांकडून हिंगे यांच्या कारला मागील सीटच्या बाजूने धडक दिली.

### पालिका निवडणूक, मोहोळांकडे धुरा

**पुणे :** भाजपने आगामी महापालिकेच्या निवडणुकीची धुरा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे दिली आहे. ही निवडणूक भाजप महायुती म्हणूनच लढणार आहे. मात्र, पक्षाची ताकद वाढेल, अशा ठिकाणीच अन्य पक्षांतील कार्यकर्त्यांना भाजपमध्ये प्रवेश दिला जाईल. पक्ष मजबूत असेल तेथे कार्यकर्त्यांनाच प्राधान्य देण्याचे निश्चित करण्यात आले आहे, असा निर्णय भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत घेण्यात आला.

### बब्बर खालसाला ब्रिटनचा दणका

**लंडन :** खलिस्तानवादी दहशतवादी संघटना बब्बर खालसाच्या आर्थिक नाड्या आवळल्यास ब्रिटन सरकारने सुरुवात केली आहे. या संघटनेवरील आर्थिक व्यव्हारावर ब्रिटनने निर्बंध लादले आहेत. अशा प्रकारचे देशात निर्बंध लादण्याची ही पहिलीच वेळ आहे. ब्रिटिश सरकारने व्यावसायिक गुरप्रीत सिंग रेहलची मालमत्ता जप्त केली आहे.

## पाच सामन्यांची मालिका ; दक्षिण आफ्रिकेला दशकापासून विजयाची प्रतीक्षा

# रोमांच वाढणार! टेस्ट-वनडेनंतर आता आज पासून टी-२० 'फाईट'!

वृत्तसंस्था। **कटक**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील एकदिवसीय मालिकेनंतर आता पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. मालिकेचा पहिला सामना मंगळवारी (९ डिसेंबर) कटक येथे होणार आहे. कसोटी मालिकेत आफ्रिकेने बाजी मारल्यानंतर, भारताने एकदिवसीय मालिकेत २-१ ने विजय मिळवत चांगली कामगिरी केली आहे. आता टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची धुरा सूर्यकुमार यादवच्या खांद्यावर असेल, तर आफ्रिकेचे नेतृत्व एडेन मार्करम करेल.

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात आतापर्यंत एकूण ३१ सामने झाले आहेत. यापैकी १८ सामन्यांमध्ये भारताने विजय मिळवला आहे, तर आफ्रिकेने १२ सामने जिंकले आहेत. एका सामन्याचा कोणताही निकाल लागला नाही. या आकडेवारीवरून स्पष्ट होते की टी-२० क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारतीय संघाचे पारडे नेहमीच जड राहिले आहे. भारतामध्ये टी-२० मालिका जिंकणे द. आफ्रिकेसाठी नेहमीच कठीण राहिले आहे. आफ्रिकेने भारताविरुद्ध आतापर्यंत फक्त दोनदाच द्विपक्षीय टी-२० मालिका जिंकली आहे. पहिली मालिका २०१२ मध्ये झाली होती, जी फक्त एका सामन्याची होती. यानंतर, २०१५ मध्ये आफ्रिकेने तीन सामन्यांची मालिका २-० ने जिंकली होती. तेव्हापासून, म्हणजेच गेल्या १० वर्षांपासून, दक्षिण आफ्रिकेला भारताविरुद्ध कोणतीही टी-२० मालिका जिंकता आलेली नाही.



**टी-२० मालिकेसाठी दोन्ही संघांचे संघ**

भारत : सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुबमन गिल, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, हर्षित राणा, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, संजू सॅमसन, वॉशिंग्टन सुंदर. दक्षिण आफ्रिका: एडन मार्करम (कर्णधार), डेवाल्ड ब्रेविस, रीझा हेंड्रिक्स, ट्रिस्टन स्टब्स, ओटनील बार्टमन, केशव महाराज, लुंगी एनगिडी, डेव्हिड मिलर, जॉर्ज लिंडे, कॉर्बिन बॉश, मार्को जेनसन, क्विंटन डी कॉक, डोनोवन फरेरा, एनरिक नॉर्खिया.

### दोन्ही संघात स्टार खेळाडूंची उपस्थिती

या टी-२० मालिकेसाठी दोन्ही संघात उत्कृष्ट आणि स्टार खेळाडूंचा समावेश आहे, ज्यामुळे ही मालिका अत्यंत रोमांचक होण्याची अपेक्षा आहे.

भारतीय संघात कर्णधार सूर्यकुमार यादवसोबत शुबमन गिल, अभिषेक शर्मा, संजू सॅमसन आणि हार्दिक पांड्या यांसारखे स्टार फलंदाज आहेत.

दुसरीकडे, एडन मार्करमच्या नेतृत्वाखालील आफ्रिकन संघात डेवाल्ड ब्रेविस, रीझा हेंड्रिक्स, डेव्हिड मिलर आणि क्विंटन डी कॉक यांसारखे विस्फोटक खेळाडू आहेत.

# नक्षलवादी नेता रामधेर ११ सहकाऱ्यांसह शरण

वृत्तसंस्था। **गडचिरोली**

नक्षलवाद्यांच्या महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड (एमएमसी) झोन प्रमुख तथा केंद्रीय समिती सदस्य रामधेर मज्जी याने अकरा सहकाऱ्यांसह सोमवारी सकाळी आत्मसमर्पण केले. या शरणागतीनंतर नक्षलवाद्यांची 'एमएमसी' समिती संपुष्टात आल्याचे मानले जात आहे. त्याच्यावर विविध राज्यात एकूण तीन कोटी रुपयांहून अधिक रकमेचे बक्षीस होते.

रामधेर मज्जी याने छत्तीसगडमधील खैरागड जिल्ह्यातील कुम्ही, बकर कट्टा पोलीस ठाण्यात आठ डिसेंबर रोजी सकाळी शस्त्रांसह आत्मसमर्पण केले. छत्तीसगडचा रहिवासी असलेला केंद्रीय समिती सदस्य रामधेर मागील तीन दशकाहून अधिक काळ नक्षल संघटनेत सक्रिय होता. २०२१ मध्ये त्याच्याकडे 'एमएमसी' समितीची जबाबदारी देण्यात आली होती. गेल्या २७ नोव्हेंबर रोजी 'एमएमसी' समितीचा प्रवक्ता अनंत उर्फ विकास याने दहा सहकाऱ्यांसह गोंदिया येथे आत्मसमर्पण केले होते. तेव्हापासूनच 'एमएमसी'चा प्रमुख आणि केंद्रीय समिती सदस्य रामधेर देखील शरण येणार असा अंदाज वर्तवला जात होता. त्याने सोमवारी सकाळी छत्तीसगडमध्ये शस्त्र खाली ठेवले. तत्पूर्वी ७ डिसेंबर रोजी याच समितीतील जहाल नक्षल कबीरसह दहा नक्षलवाद्यांनी मध्य प्रदेशातील बालाघाट येथे आत्मसमर्पण केले.

### 'एमएमसी' समिती जवळपास संपुष्टात

नक्षलवादी संघटनेमध्ये दंडकारण्य आणि एमएमसी समितीला खूप महत्व आहे. या समितीचा प्रवक्ता अनंतने शरणागतीसाठी फेब्रुवारीपर्यंत वेळ मागितली होती. त्याला सरकारकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे त्याने १ जानेवारीला शस्त्र खाली ठेवणार असल्याचे जाहीर केले. परंतु सुरक्षा दलाचा दबाव वाढत असल्याने सदस्यांनी टप्प्याटप्प्याने या मुदतीपूर्वीच आत्मसमर्पण केले. या आत्मसमर्पणामुळे संपूर्ण 'एमएमसी' समिती संपुष्टात आली आहे.

## नवीन कामगार संहितेची प्रभावी अंमलबजावणी करा

### कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

वृत्तसंस्था। **नागपूर**

केंद्र शासनाने चार नवीन कामगार संहिता देशभरात लागू केल्या आहेत. या संहितांच्या तरतुदींची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले. ना. म. लोखंडे श्रम विज्ञान संस्था, नागपूर येथे नवीन कामगार संहितांच्या अंमलबजावणीबाबत आयोजित बैठकीत फुंडकर यांनी आढावा घेतला.

या बैठकीस कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. एन. कुंदन, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक कुंभार, उपसचिव दीपक पोकळ आदी उपस्थित होते. वेतन संहिता, औद्योगिक संबंध संहिता, सामाजिक सुरक्षा संहिता आणि व्यावसायिक सुरक्षा आरोग्य कामाची स्थिती संहिता या चार नवीन कामगार संहिता २१ नोव्हेंबर २०२५ पासून देशभरात लागू करण्यात आल्या आहेत. कामगार मंत्री फुंडकर म्हणाले, नवीन कामगार संहितांच्या प्रत्येक तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी विभागाने सज्ज असावे. कामगार संहितेबाबत जनजागृती करण्यात यावी. राज्यात बदल लक्षात घेऊन अधिसूचना काढण्याचे निर्देश दिले.

# वंदे मातरम् व राज्यगीताने विधिमंडळाचे कामकाज सुरू

वृत्तसंस्था। **नागपूर**

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या विधानसभेच्या कामकाजास वंदे मातरम या राष्ट्रगीताने व जय जय महाराष्ट्र माझा या राज्यगीताने सुरूवात झाली. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्रीगण यांच्यासह सभागृहाचे सदस्य उपस्थित होते. यावेळी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिलेल्या वंदे मातरम या गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सभागृहात वंदे मातरम गीताचे संपूर्ण गायन करण्यात आले. वंदे मातरम् व 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताने विधानपरिषदेत कामकाजाची सुरुवात झाली. तद्नंतर वंदे मातरम् गीताचे संपूर्ण गायन करण्यात आले. यावेळी सभापती प्रा. राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मंत्रिमंडळ सदस्य व विधान परिषद सदस्य उपस्थित होते.

**विधानसभा तालिका अध्यक्ष जाहीर**

विधानसभेच्या तालिका अध्यक्षांची नावे विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी जाहीर केली. विधानसभेच्या तालिका अध्यक्षपदी विधानसभा सदस्य चैनसुख संचेती, किशोर आप्पा पाटील, सरोज अहिरे, डॉ. राहुल पाटील, उत्तमराव जानकर, रामदास मसराम, समीर कुणावार यांची नामनियुक्ती करण्यात आली आहे.



**विधान परिषद तालिका सभापतींची नियुक्ती**

विधान परिषदेच्या कामकाजासाठी तालिका सभापतींची नियुक्ती सभापती प्रा. राम शिंदे यांनी सभागृहात जाहीर केली. तालिका सभापती म्हणून अमित गोरखे, कृपाल तुमाने, अमोल मिटकरी, धीरज लिंगाडे आणि सुनील शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**दिवंगत सदस्यांना सभागृहांत श्रद्धांजली**

महाराष्ट्र विधानसभा सभागृहाने माजी मंत्री, माजी आमदार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव एकमताने मंजूर केला. कै. शिवाजीराव कर्डिले, महादेवराव शिवणकर, भारत बोंद्रे, श्याम उर्फ जनार्दन अष्टेकर, यशवंत दळवी, नारायण पटेल, सिद्रामप्पा मलकप्पा पाटील, गिल्बर्ट मेंडोंसा, राजीव देशमुख आणि निर्मला ठोकळ या लोकप्रतिनिधी व समाजसेवकांनी शिक्षण, सहकार, शेती, क्रीडा, जलसंधारण, उद्योग, आरोग्य, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. या दिवंगत सदस्यांनी विधानसभा, लोकसभा, पालिका, जिल्हा परिषद, सहकारी संस्था, शिक्षणसंस्था यामधून दीर्घकाळ जनसेवा केली. त्यांच्या निधनामुळे राज्याची अपरिमित हानी झाल्याचे विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी नमूद केले. शोक प्रस्ताव मंजूर करताना सदस्यांनी उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली. विधान परिषदेत निर्मला शंकरराव ठोकळ आणि प्रकाश केशवराव देवळे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सभापती प्रा. राम शिंदे यांनी शोक प्रस्ताव मांडला.

### पाणंद रस्ते योजना मंत्रिमंडळात मंजूर

वृत्तसंस्था। **नागपूर**

शेतकऱ्यांची अनेक वर्षांची अडचण दूर करण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना मंजूर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आली. या निर्णयानुसार, शेत रस्ते तयार करण्यासाठी १०० टक्के यंत्रसामुग्रीचा वापर करता येणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे समितीच्या अध्यक्षेखालील पालकमंत्री व आमदारांचा समावेश असलेली समिती पाणंद रस्त्यांबाबत निर्णय घेणार आहे. मनरेगा अंतर्गत रस्ते तयार करताना जाचक अटी होत्या. रस्ते झाल्यानंतर शेतकऱ्यांना पेरणी, कापणी आणि शेतमाल बाजारात नेण्यासाठी बारमाही मजबूत रस्ते उपलब्ध होणार आहेत.

## अमेरिकी उपाध्यक्षांचा पायावर धोंडा

# 'भारतीय पत्नीला भारतात आता परत पाठवणार का?

वृत्तसंस्था। **वॉशिंग्टन**



अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स यांनी स्थलांतरितांबद्दल वक्तव्य करून आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतला आहे. 'मोठ्या प्रमाणात स्थलांतर म्हणजे अमेरिकन स्वप्नाची चोरी आहे', वक्तव्य त्यांनी केले होते. त्यानंतर त्यांना सोशल मीडियावर तुफान ट्रोल करण्यात येत असून तुमच्या पत्नीला भारतात परत पाठवणार का, असे विचारले जात आहे.

अमेरिकेत होणाऱ्या मोठ्या प्रमाणात स्थलांतराच्या मुद्याबाबत बोलताना व्हान्स यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत म्हटले होते की, मोठ्या प्रमाणात होणारं स्थलांतर हे अमेरिकन स्वप्नाची चोरी आहे आणि त्यामुळे स्थलांतरित अमेरिकन कामगारांकडून संधी हिरावून घेत आहेत. यानंतर अमेरिकेत त्यांना ट्रोल केले जात आहे. व्हान्स यांची पत्नी उषा व्हान्स या भारतीय स्थलांतरितांच्या अमेरिकेत जन्मलेल्या कन्या आहेत. व्हान्स यांनी यापूर्वी त्यांची हिंदू पत्नी चर्चमध्ये आल्यास आवडेल असे म्हटले होते. त्यावरून उषा व्हान्स धर्मांतर करणार असल्याची चर्चा रंगली होती.

### साडेतेवीस लाखांचा अवैध वाळुसाठा जप्त

वृत्तसंस्था। **उस्माननगर**

चिंचोली शिवारातील गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळूउपशाला शनिवारी उस्माननगर पोलिसांनी महसूल पथकाच्या मदतीने मोठा चाप लावला. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या संयुक्त कारवाईत तब्बल २३ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. परमेश्वर अंगदराव शिंदे (रा. डोळारा), हनुमंत तुकाराम जाधव (रा. चिंचोली), आकाश माधवराव जाधव (रा. चिंचोली), गोपीनाथ पांडुरंग जाधव (रा. चिंचोली) आणि सतीश लक्ष्मण येडे पाटील (रा. मारतळा) यांच्यावर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. संयुक्त कारवाई पुढील काळातही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# महापालिका क्षेत्रातील प्रकल्प, आरोग्य क्षेत्रासाठी मोठी तरतूद

वृत्तसंस्था। **नागपूर**

राज्य सरकारने विधिमंडळात सादर केलेल्या ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी पुरवणी मागण्यांद्वारे विविध योजनांसाठी तरतूद केल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः निवडणुकांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनेक कामे व प्रकल्प हाती घेण्यात आल्याने त्यावरील खर्च वाढला आहे.

महापालिका क्षेत्रातील प्रकल्पांच्या कामांसाठी व विशेष अनुदानासाठी दोन हजार २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अमृतसह नागरी सेवासुविधांसाठी सुमारे अडीच हजार कोटी रुपये देण्यात आले आहेत. मुंबईसह अन्य शहरांमधील मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या कामांसाठी मुद्रांक शुल्कावर अधिभार आकारला जातो. तो या प्रकल्पांना देण्यासाठी अडीच हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आरोग्य क्षेत्रासाठी मोठी तरतूद असून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानासाठी एक हजार ७७८ कोटी रुपये आणि पंतप्रधान जनआरोग्य व आयुष्मान योजनेसाठी तीन हजार २८१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व अन्य योजनांसाठी एक हजार ६१५ कोटी रुपये, तर सारथी, बार्टी, महाज्योती आदीं संस्थांसाठी ४६५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

गोशाळांसाठी १२२ कोटी ६४ लाख, मेट्रो प्रकल्प कर्ज व व्याज परतफेडीसाठी १५०० कोटी रुपये, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, अमृत अभियान, नगरपालिका, नगरपंचायतींसाठी ५५५२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

### जालना-नांदेड द्रुतगती महामार्गासाठी तरतूद

महापालिका क्षेत्रातील कामे व नगरपरिषदांना विशेष अनुदान १००० कोटी रुपये, समृद्धी महामार्गावर इंटेलिजंट ट्रान्सपोर्टेशन सिस्टीम प्रणालीसाठी ५०० कोटी रुपये, पुणे रिंगरोड व जालना नांदेड द्रुतगती महामार्ग प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जावरील व्याज व भांडवली अंशदानासाठी ९२५ कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे.

## पान एकवरून

**कष्टकऱ्यांचे नेते डॉ. आढाव...**

तीन दिवसांपूर्वी अधिकृतपणे ते गंभीर अवस्थेत असल्याचे मान्य करून अफवा पसरवू नये, असे आवाहन केले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनीही त्यांची भेट घेऊन विचारपूस केली होती. दरम्यान, पूना हॉस्पिटलमध्ये हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजित वैद्य यांच्यासह तज्ज्ञ डॉक्टरांच्या संपूर्ण टीमच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मात्र, सोमवारी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाचे वृत्त समजल्यानंतर कार्यकर्त्यांचे लोंढे हॉस्पिटल परिसरात दाखल होण्यास सुरुवात झाली होती.

**हिवाळी अधिवेशनात ७५ हजार...**

तर नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यासाठीच्या कामांसाठी तीन हजार कोटी रुपये देण्यात येणार आहेत. राज्याची २०२५-२६ साठी महसुली तूट ४५ हजार ८९१ कोटी रुपये, तर राजकोषीय तूट एक लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये इतकी आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी सहा हजार १०३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून शेतकरी मोफत वीज, यंत्रमागधारकांना सवलतीने वीज, कृषीपंप व ऊर्जा विभागाच्या विविध योजनांसाठी नऊ हजार २५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या भांडवली गुंतवणुकीसाठी चार हजार ४४४० कोटी रुपये, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी केंद्र व राज्य हिश्श्यापोटी तीन हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**कत्तलीचा कट उधळला...**

बोंडार भागात अवैधरीत्या गोवंश वाहतूक होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच तातडीने कारवाई सुरू करण्यात आली. आलुपेंज मार्केटकडून गाडेगाव रोडकडे येणारी बोलेरो पिकअप ( ०२ ०९७८) गौवंश कत्तलीसाठी भरलेली असल्याचा संशय होता. त्यानुसार पहाटे सुमारे ६ वाजता पथकाने मार्केट परिसरात छापा टाकत वाहन ताब्यात घेतले.तपासणीदरम्यान वाहनात अत्यंत अमानुष पद्धतीने कोंबून भरलेली पाच गोवंशीय जनावरे आढळली. जप्त जनावरांची किंमत अंदाजे ३ लाख २५ हजार रुपये, तर बोलेरो पिकअपची किंमत सुमारे ६ लाख रुपये असल्याचे तपासात स्पष्ट झाले. आरोपीसह संपूर्ण मुद्देमाल नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला असून, संबंधित प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**रब्बी हंगामासाठी 'विष्णुपुरी'तून...**

पाणी अर्ज मंजूर करण्यात येईल अन्यथा पाणी अर्ज नामंजूर झालेल्या अर्जदारांना पाणीपुरवठा करणे बंधनकारक राहणार नाही. बुधवारपूर्वी (ता. १०) संबधित शाखा कार्यालयात अर्ज सादर करणे बंधनकारक राहील. सिंचनासाठी पाण्याची गरज तसेच विहीत नमुन्यात प्राप्त मागणी अर्ज संख्या विचारात घेऊनच प्रत्यक्ष सिंचनासाठी पहिली पाणीपाळी १५ डिसेंबर रोजी सुरू करण्याचे अपेक्षित नियोजन आहे. विष्णुपूरी प्रकल्पांतर्गत असलेल्या वितरण व्यवस्थेद्वारे प्रत्येक पाणीपाळीच्या कालवा संचलनाच्या प्रस्तावित कार्यक्रमानुसार प्राप्त मागणीनुसार सिंचनासाठी सोडण्यात येईल.

**थकित, चालू पाणीपट्टी भरण्याचे आवाहन :** शासन निर्णयाप्रमाणे विहीत दरानुसार पाणीपट्टीचे दर आकारण्यात येतील. थकित व चालू पाणीपट्टी वेळेत भरून सहकार्य करावे. शेतचारी स्वच्छ व दुरुस्त ठेवण्याची जबाबदारी संबंधित लाभधारकांची राहील. उडाप्याच्या अंतिम क्षेत्रास पाणीपुरवठा करणे बंधनकारक राहणार नाही. पाणी पाळी सुरू असताना जबरदस्तीने अथवा विनापरवानगी विद्युत मोटारी, ट्रॅक्टरद्वारे पाणी उपसा केल्यास अथवा गेट उघडल्यास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.संबंधित प्रकल्पाच्या विभागामार्फत सर्व लाभधारकांना पाणी मिळेल या दृष्टीने पुरेपुर प्रयत्न करण्यात येत आहेत. याची संबंधित लाभधारकांनी नोंद घ्यावी, असेही आवाहन नांदेड पाटबंधारे विभागाचे (उत्तर) उपकार्यकारी अभियंता बी. जे. परदेशी यांनी केले.

**जिल्हा परिषदेचा मद्यपी...**

अनागोंदी कारभाराविषयीं तीव्र संतापही व्यक्त केला गेला. त्यानंतर या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या निर्देशानुसार प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांनी माहूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांना याप्रकरणी तत्काळ चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार गटशिक्षणाधिकारी दि.६ डिसेंबर रोजी चौकशीसाठी संबंधित शाळेत गेले असता अनंत वर्मा हे शिक्षक त्यादिवशीही दारूच्या नशेत असल्याचे आढळून आले. याविषयीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला असल्याच्या कारणावरून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दोषी शिक्षक अनंत वर्मा यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ३ नुसार सेवेतून निलंबित करण्याची कारवाई केली आहे. तसेच निलंबन काळात त्यांचे मुख्यालय शिक्षण विभाग (प्रा.) जिल्हा परिषद हे राहील, असेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

**'शिंदेचे आमदार घेऊन काय...**

चर्चेला उधाण आले. या वक्तव्याचे महाराष्ट्रातील राजकीय क्षेत्रातही पडसाद उमटले. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांना माध्यम प्रतिनिधींनी विचारणा केली. त्यावर ते म्हणाले की, शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार भाजपात घेऊन काय करायचं? ते आमचेच आहेत. शिंदे शिवसेना ही आमचा मित्र पक्ष आहे. तीच खरी शिवसेना आहे. आमच्या मित्र पक्षाचे आमदार आमच्याकडे घेण्याचे अशा प्रकारचे राजकारण आम्ही कधीही करत नाहीत. उलट शिंदेंची शिवसेना आणखी मजबूत झाली पाहिजे, यासाठी आम्ही शिवसेनेच्या पाठिशी आहोत. तसेच भविष्यात नक्कीच भाजपा, शिवसेना आणि आमची महायुती आणखी मजबूत होताना दिसेल, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

**२१ डिसेंबरची 'एमपीएससी'...**

त्यामुळे २१ डिसेंबरची संयुक्त पूर्व परीक्षा होणार की पुन्हा पुढे ढकलली जाणार? असा संभ्रम विद्यार्थ्यांना होता. यंदा ६७४ पदांसाठी जाहिरात देण्यात आली. यामध्ये सहायक कक्ष अधिकारी ३, राज्य कर निरीक्षक २७९ पदे आणि पोलीस उपनिरीक्षकाच्या ३९२ पदांचा समावेश आहे. ही परीक्षा मूळ ९ नोव्हेंबर रोजी होणार होती. मात्र, महाराष्ट्राच्या काही भागातील पूर परिस्थितीमुळे ती पुढे ढकलून २१ डिसेंबरला घेण्याचा निर्णय घेतला होता. आता मतमोजणीमुळे या परीक्षेच्या तारखेत पुन्हा बदल झाला आहे. शिवाय महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा आता ११ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.

**केळी, आंब्याला हवामान आधारित...**

याबरोबरच केळीसाठी जिल्ह्यातील १८ महसूल मंडलांतील १२५८ शेतकऱ्यांसह केंद्र व राज्य सरकारने कंपनीकडे ८१२.४१ हेक्टरसाठी दोन कोटी ६२ लाख ४७ हजार रुपयांचा विमा हप्ता भरला. यात कमी तापमान व उच्च तापमान या घटकाअंतर्गत चार कोटी ३४ लाख २४ हजार ५८९ रुपये विमा परतावा मंजूर झाला.

यात कमी तापमान घटकात अर्धापूर तालुक्यातील मालेगाव व अर्धापूर मंडल, नांदेड तालुक्यातील नांदेड ग्रामीण मंडल, तुप्पा मंडल व विष्णुपुरी या पाच मंडलांत विमा परतावा मंजूर झाला नाही. तर जास्त तापमान घटकाअंतर्गत मुदखेड तालुक्यातील बारड मंडलास एप्रिल व मे या दोन महिन्यातील जास्त तापमानाचे ट्रिगर लागू झाले नाही.इतर १७ मंडलांना जास्त तापमानाचे ट्रिगर लागू झाले. कमी तापमान, जास्त तापमानाचे ट्रिगर मंजूर झालेल्या मंडलांत केळीसाठी हेक्टरी ७४ हजार ६७९ रुपये विमा परतावा मंजूर झाला.

# जिल्ह्यात जगनाडे महाराज यांची जयंती साजरी


जि.प.शाळा जवळा देशमुख


एसटी आगार नांदेड


पंचशील विद्यालय हदगाव


तहसील कार्यालय मुदखेड

प्रतिनिधी | **नांदेड**

ज्ञान, भक्ती, साधना आणि मानवतेची सेवाभाव जागृत करणारे संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती जिल्हयात, शासकीय कार्यालय, शाळा, महालिय या ठिकाणी साजरी करण्यात आली. संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून विविध ठिकाणी अभिवादन करण्यात आले.

**जि.प. शाळा जवळा**

संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे सहाय्यक श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची ४०१ वी जयंती जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षिका संगिता बडवणे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सूरज गोडबोले, सदस्य आनंदा गोडबोले, ग्रामपंचायत कार्यालय कर्मचारी मारोती चक्रधर, अंगणवाडी सेविका इंदिरा पांचाळ, हैदर शेख, मनीषा गच्वे, हरिदास पांचाळ, बालाजी पांचाळ, चाँद शेख यांची उपस्थिती होती.

**एस.टी.आगार नांदेड**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ एसटी आगार येथे दि.८ डिसेंबर सोमवार रोजी सकाळी १०.३० वाजता तेली समाजाचे आराध्य दैवत, संत तुकाराम महाराज गाथेचे मूळ लेखक, प्रस्तापित अन्यायाविरूद्ध संघर्ष करणारे वारकरी संत, तुकाराम महाराज यांचे पटशिष्य संत संताजी जगनाडे महाराज यांची ४०१ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती अभिवादन कार्यक्रम सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक मिलींदकुमार सोनाळे, बसस्थानक प्रमुख यासीन हामीद खान, चार्जमन योगेश्वर जगताप, एसटी मेकॅनिक गुणवंत मिसलवाड, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, नितीन मांजमकर, सौ.सुनिता हुंबे, कृष्णा पवार, यांत्रीक शेख आलीम, वाहक व्ही.आर.भोईवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

**पंचशील विद्यालय हदगाव**

शहरातील पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयात संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक गोपाल बंड्रेवार, पर्यवेक्षक अनिल दस्तूरकर, मुन्ना बेळकुंदे, नांदेड येथील शासकीय तंत्रनिकेतनचे प्रा.विजयकुमार राठोड, प्रा.डॉ.अनघा जोशी, प्रा.मोहित मेश्राम यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक वाढवे यांनी केले.

**पंचशील विद्यालय हदगाव**

शहरातील पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयात संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक गोपाल बंड्रेवार, पर्यवेक्षक अनिल दस्तूरकर, मुन्ना बेळकुंदे, नांदेड येथील शासकीय तंत्रनिकेतनचे प्रा.विजयकुमार राठोड, प्रा.डॉ.अनघा जोशी, प्रा.मोहित मेश्राम यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक वाढवे यांनी केले.

**मुदखेड तहसील कार्यालय**

मुदखेड येथील तहसील कार्यालयात तेली समाज बांधव, महसूल प्रशासन आणि पत्रकारांच्या उपस्थितीत संत संताजी जगनाडे महाराज यांची ४०१ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. तहसील कार्यालयात दि ८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता नायब तहसीलदार कामठेकर यांच्या शुभहस्ते संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. नायब तहसीलदार पाठे यांनी जगनाडे महाराजांच्या कार्याची महती सांगून त्यांच्या विचारांवर आधारित आचरण करण्याचे आवाहन केले.

यावेळी नायब तहसीलदार कामटेकर , नायब तहसीलदार पाटे, नायब तहसीलदार समीर पवणे, शाम चौधरी, गोविंद पानसरे, विनायकराव वच्छेवार, ईश्वर पिन्नलवार, राम कूलूपवार, चंद्रकांत पिन्नलवार ,गंगाधर पंगिरवार, शंकरराव पंगीरवार, शिवाजी पिनलवार , बालाजी आजगुळकर, शैलेश पंगिरवार, महेश पिनलवार, पत्रकार रूकमाजी शिंदे, प्रल्हाद मस्के, धम्मदाता कांबळे यांच्या सह महीला व तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मांडवा गावातील अवैध दारू बंद करा ; महिलांची मागणी



प्रतिनिधी | **किनवट**

किनवट पोलिस स्टेशन येथे नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी किनवट तालुक्यातील मांडवा या गावात अचानक भेट दिली. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा महिला उपाध्यक्षा सौ. सागरताई शिंदे यांनी सन्मानपूर्वक महिलांच्या वतीने पोलीस निरीक्षक गणेश कराड यांचा सत्कार केला.

पोलीस निरीक्षकांचा सत्कार करून ह्या रणरागिनी महिला एवढ्यावरच थांबल्या नाहीत तर त्यांनी मांडवा गावातील अवैध दारु विक्री बंद करण्याची चक्क मागणी केली. आणि गावातील काही किरकोळ वादविवाद गावातच सुटल्या जावेत अशा अपेक्षा व्यक्त केल्या.

कराड यांनी सुद्धा महिलांच्या या मागणीला प्रतिसाद देत त्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने सदैव मी प्रयत्नशील राहील अशी ग्वाही दिली. महिलांना व गावकऱ्यांना मोठा दिलासा दिला.

**पोलीस प्रशासनाचे सहकार्य**

गावातील काही किरकोळ वादविवाद गावातच सुटल्या जावेत अशा अपेक्षा व्यक्त केल्या. कराड यांनी सुद्धा महिलांच्या या मागणीला प्रतिसाद देत त्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने सदैव मी प्रयत्नशील राहील अशी ग्वाही दिली. महिलांना व गावकऱ्यांना मोठा दिलासा दिला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. सागरताई शिंदे पाटील भाजपा महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्षा या होत्या प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक गणेश कराड मांडवा बिट जमादार पुरी, प्रकाश बोधनकर आणि इतर कर्मचारी उपस्थित होते. मंचावर उपस्थित ग्रामसेवक आरमाळकर.सरपंच सुनिता आत्राम. रामु धर्वे, राजू मेसावार, बालाजी गिते व गावातील प्रतिष्ठित महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती.

## संक्षिप्त

### गुरूवारी लोणी येथे महाप्रसादाचे आयोजन

**नांदेड :** लोणी खुर्द ता. अर्धापूर येथील गट नं. २०४, अशोक गो. देशमुख, सौ. वैजयंती अशोक देशमुख व रविंद्र गो. देशमुख यांच्या शेत जमिनीतील स्थित जागेमध्ये असलेल्या मंदिराची पुनर्बांधणी झाली असून येथे दि. ५ डिसेंबरपासून हरिनाम सप्ताह चालू आहे. सप्ताहाची सांगता व कामाई देवीच्या मूर्तीची पुनर्स्थापना दि. ११ डिसेंबर २०२५ गुरूवारी होत असून या निमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

### स्ट्राँग गोल्ड ब्ल्यू फाउंडेशनतर्फे रक्तदान

**नांदेड :** स्ट्राँग गोल्ड ब्ल्यू फाउंडेशन, नांदेड यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिर व गीतपुष्पांजली कार्यक्रम सामाजिक बांधिलकीची परंपरा जपत यंदाही उत्साहात संपन्न झाला. सलग अठरा वर्षे हा उपक्रम शासन नियमांचे पालन करून राबविला जात आहे.

### ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ

**नांदेड :** सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२५-२६ संकलन शुभारंभ कार्यक्रम बुधवार १० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.१५ वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमास अनेक शासकीय मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# यशवंत महाविद्यालयात आज डॉ.संध्या रंगारी यांचे व्याख्यान

प्रतिनिधी | **नांदेड**

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयात भारतीय



संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि.९ डिसेंबर, मंगळवार रोजी सकाळी ११ वाजता मानव्यविज्ञान विद्या शाखा आय.सी.टी. हॉलमध्ये नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आखाडा बाळापूर येथील मराठीच्या साहित्यिका डॉ.संध्या रंगारी यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री उत्कर्षाची नवी पहाट या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू व विद्यमान प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे भूषविणार आहेत.याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे आणि डॉ.हरिश्चंद्र पतंगे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

तरी या व्याख्यानाचा लाभ घेण्याचे आवाहन यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला समिती समन्वयक डॉ. संदीप पाईकराव, समिती सदस्य डॉ.गौतम दुथडे, डॉ.मीरा फड, डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड, ग्रंथपाल डॉ.कैलास वडजे, डॉ. राजरत्न सोनटक्के, प्रा. शांतुलाल मावस्कर, डॉ. अजय गव्हाणे, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील यांनी केले आहे.

# माळेगाव यात्रेनिमित्त पोलीस अंमलदारांना अधिकार प्रदान

प्रतिनिधी | **नांदेड**

माळेगाव येथील खंडोबा यात्रेतील पालखी मिरवणूक व इतर कार्यक्रम शांततेत पार पडावे. त्यात कसल्याही प्रकारची बाधा येऊ नये व शांतता रहावी म्हणून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी मुंबई पोलीस कायदा १९५१ कलम ३६ अन्वये प्राप्त अधिकारान्वये १८ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्रीपासून ते २३ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत कंधारचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती अश्विनी जगताप व माळाकोळीचे सहा. पोलीस निरीक्षक महेश मुळीक यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३६ मधील पोट कलम अ ते फ प्रमाणे पुढील अधिकार प्रदान केले आहेत.

श्री खंडोबा यात्रेत महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक, इतर राज्यातून भाविकांची दर्शनासाठी व यात्रेसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. त्याअनुषंगाने रस्त्यावरील व रस्त्याने जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी कशा रितीने चालावे व कोणत्या रितीने वागावे हे फर्मविण्यासाठी. अशा कोणत्याही मिरवणुका कोणत्या मार्गाने आणि कोणत्या वेळात काढाव्यात किंवा काढू नयेत असे मार्ग व अशा वेळा विहित करण्याबद्दल. सर्व मिरवणुकीच्या व जमावाच्या प्रसंगी व पुजा-अर्चेच्या प्रार्थना स्थळाच्या सर्व जागेच्या आसपास पुजा-अर्चे च्या वेळी कोणताही रस्ता किंवा सार्वजनिक जागा येथे गर्दी होणार असेल किंवा अडथळे होण्याचा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा होऊ न देण्याबद्दल. सर्व रस्त्यावर किंवा रस्त्यांमध्ये, घाटांत किंवा घाटांवर, सर्व धक्क्यांवर व धक्क्यांमध्ये आणि सार्वजनिक स्नानाच्या, कपडे धुण्याच्या व उतरण्याच्या जागांच्या ठिकाणी व जागांमध्ये, जत्रा, देवालये आणि सार्वजनिक स्थळी किंवा लोकांच्या जाण्या-येण्याच्या जागेमध्ये सुव्यवस्था राखण्याबद्दल. तसेच सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी ध्वनीक्षेपकांच्या आवाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी व सूचना देण्यासंबंधी. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३, ३५ ते ४०, ४२, ४३, ४५ या अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशास अधीन असलेले व त्यास पुष्टी देणारे सुव्यवस्था राखणे कामी योग्य आदेश देण्याबाबत.

कोणीही इसमांनी हा आदेश लागू असे पर्यंत नांदेड जिल्ह्यातील कंधार येथील उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती अश्विनी जगताप व माळाकोळीचे सहा. पोलीस निरीक्षक महेश मुळीक यांचेकडून रहदारीचे नियम व मार्गाबाबत सुचना कार्यक्रमाची तारीख, वेळ, जाहीर सभा, मोर्चे, मिरवणूक, निदर्शने, पदयात्रा इत्यादी कार्यक्रम संबंधीत पोलीस फौजदार किंवा वरिष्ठ अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

परवानगी दिलेल्या जाहिर सभा,मिरवणूका,पदयात्रा यात समयोजित घोषणा सोडून किंवा ज्या घोषणांनी शांतता व सुव्यवस्थेला बाधा होऊ शकते अशा घोषणा देऊ नये.

हा आदेश लग्नाच्या ठिकाणी, प्रेत यात्रेस लागू नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास मुंबई कायदा कलम १३४ प्रमाणे अपराधास पात्र ठरेल, असे आदेशही पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जारी केले आहेत.

‘स्वारातीम’ विद्यापीठामध्ये

# संत संताजी जगनाडे यांची जयंती साजरी

प्रतिनिधी | **नांदेड**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज दि.८ डिसेंबर, रोजी संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम, के. पाटील, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ.शैलेश वाढेर, डॉ. भास्कर माने, माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजेंद्र गोणारकर आदींनी पुष्प अर्पण केले.



# साकेत बुध्दविहार छताच्या कामाचा शुभारंभ

प्रतिनिधी | **नांदेड**

राजनगर चंद्रगुप्तनगर येथील साकेत बुद्ध विहाराच्या सभा मंडपाच्या बांधकामाचे छताचे काम चालू आहे.

छत भरणी करते वेळेस या ठिकाणी पुष्प पूजा, बुद्ध वंदना घेऊन कामाला सुरुवात करण्यात आले.

यावेळी साकेत बुद्ध विहाराचे अध्यक्ष डी. एस. मोरे, उपाध्यक्ष अरुण कांबळे, सचिव गणपत बनसोडे, विश्वस्त शंकरराव पवार, भीमराव ढवळे, शंकरराव एडके व तसेच महामाया महिला मंडळाच्या अध्यक्षा सुमनबाई कांबळे, कांताबाई वाघमारे, पंचशीलाबाई रसाळे, अरुणाबाई चौथरे , कुसुमबाई वाघमारे, अनुसयाबाई कांबळे, छायाबाई एडके, गायकवाडबाई, संघमित्रा एडके, भालेरावबाई इत्यादी महिला मंडळाची उपस्थिती होती .

### संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी

प्रतिनिधी : **नांदेड**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यावेळी, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू उपउपकुलसचिव डॉ. सुनिल फुगारे यांनी प्रतिमेस अभिवादन केले.

# किनवट येथे पंधरावी जागतिक बौध्द धम्म परिषद १४ व १५ फेब्रुवारीला

प्रतिनिधी | **किनवट**

तथागत बुद्ध आणि महामानव डॉ.



बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारप्रवाहाचे संवर्धन व प्रसार करण्यासाठी किनवट येथील बुद्धमुर्ती परिसर, समतानगर येथे पंधरावी जागतिक बौध्द धम्म परिषदेचे आयोजन दि. १४ व १५ फेब्रुवारी २०२६ रोजी (शनिवार-रविवार) करण्यात आले आहे. आंबेडकरी आंदोलनाचे केंद्र मानल्या जाणाऱ्या किनवट शहरात दरवर्षीप्रमाणे यंदाही परिषद मोठ्या उत्साहात होत असून यासाठीची तयारी अंतिम टप्प्यात आहे.

या वर्षीच्या परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून पुर्णा नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रा. डॉ. मोहनराव मोरे, दराटीकर यांची निवड करण्यात आली आहे. परिषद यशस्वी व्हावी यासाठी सुनिल भरणे, मिलिंद कांबळे, बाबासाहेब मुनेश्वर, सुरेश कावळे, प्रदिप सावते, चंद्रभीम हौजेकर, माधव शेंद्रे, एकनाथ मानकर, दीपक अडागळे आदी कार्यकर्ते तयारीत आहेत.

# डॉ.ओंकार दाढेल यांची एमडी रेडिओलॉजीसाठी निवड

प्रतिनिधी | **पाथरी**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात



करत पत्रकार भारत दाढेल आणि प्रा. डॉ. विजया दाढेल यांचे सुपुत्र डॉ. ओंकार दाढेल यांची एमडी रेडिओलॉजी अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. जम्मूकाश्मीरमधील श्रीनगर येथील प्रतिष्ठित शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये त्यांना प्रवेश मिळाला आहे.

डॉ. ओंकार यांनी पुण्यातील एमआयटी मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस पूर्ण केले. अभ्यासातील शिस्त, जिद्द आणि सातत्य यांच्या जोरावर त्यांनी नीट-पीजी परिक्षेत उल्लेखनीय यश मिळवले.

पहिल्याच यादीनुसार त्यांची एमडी रेडिओलॉजीसाठी निवड झाली असून व्यावसायिक शिक्षणाच्या शिडीवर त्यांनी मोठी झेप घेतली आहे.

घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने माझे ध्येय साध्य करणे हे सर्वात मोठे आव्हान होते. अभ्यासातील सातत्य आणि ध्येय डोळ्यांसमोर ठेवूनच मला हे यश मिळाले. या प्रवासात माझ्या आई-वडिलांचा मोलाचा वाटा असल्याचे डॉ. ओंकार दाढेल यांनी सांगितले.

**सहल** | पॅकेज टूर अंतर्गत कंधार आगारातर्फे

# गड किल्ले,धार्मिक दर्शनाची प्रवाशांना संधी

प्रतिनिधी | **कंधार**

पर्यटन व धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी प्रवाशांच्या मागणीनुसार ४४ प्रवासी थेट उपलब्ध असल्यास कंधार आगारातून ज्यादा बसेस सोडण्यात येणार असून यामध्ये महिला सन्मान योजनेअंतर्गत ५० टक्के तसेच जेष्ठ नागरिक अमृत योजनेची समावेश असणार असून या संधीचा इच्छुक प्रवाशांनी लाभ घ्यावा असे आव्हान कंधार आगाराच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्य परिवहन महामंडळ च्या नांदेड विभागातून या पर्यटन बस सेवेचे नियोजन करण्यात येणार असून प्रवासी समूहाला एकत्रित प्रवास करून महाराष्ट्रातील विविध मंदिर धार्मिक क्षेत्र, गड किल्ले इत्यादी ठिकाणी भेट देऊन राज्यपरिवाहनच्या सेवेचा अल्प दरात लाभ घेता येणार आहे. कंधार आगारातून पर्यटन व धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्यात आले असून जर ४४ प्रवासी थेट उपलब्ध होत असतील तर ज्यादा बसेसही सोडण्यात येणार आहेत, तसेच दशमी, एकादशी, द्वादशीला कंधार आगारातून पंढरपूर येथे जाण्यासाठी जादा बसेस सोडण्याचेही नियोजन करण्यात आले आहे.

राज्य परिवहन महामंडळातर्फे सुरू केलेल्या पर्यटन बसचा प्रवाशांनी यापूर्वी महाराष्ट्रातील अनेक देवदर्शन व इतर ठिकाणी लाभ घेतला आहे. ही बस सेवा अल्प दरात, अत्यंत सुरक्षित आणि पर्यटनांचा आनंद देणारी असून प्रवाशांनी स्वतः या क्षणाचे साक्षीदार होऊन पंढरपूर कोल्हापूरसह विविध परिसरातील स्थळांना भेटी देण्याची संधी कंधार व लोहा परिसरातील प्रवाशांना व इतर पर्यटकांनाही मिळणार आहे.



**देवदर्शनाचा पर्यटकांना सुलभ लाभ**

राज्य परिवहन महामंडळातर्फे सुरू केलेल्या पर्यटन बसचा प्रवाशांनी यापूर्वी महाराष्ट्रातील अनेक देवदर्शन व इतर ठिकाणी लाभ घेतला आहे. ही बस सेवा अल्प दरात, अत्यंत सुरक्षित आणि पर्यटनांचा आनंद देणारी असून प्रवाशांनी स्वतः या क्षणाचे साक्षीदार होऊन पंढरपूर कोल्हापूरसह विविध परिसरातील स्थळांना भेटी देण्याची संधी कंधार व लोहा परिसरातील प्रवाशांना व इतर पर्यटकांनाही मिळणार आहे.

**जाहीर प्रगटन**

**दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड यांच्या न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ३०६/२०२५**

**भारतबाई भ्र. गंगाधर मोरे व इतर ४ वि. निरंक**

अर्जदारः-१.भारतबाई भ्र. गंगाधर मोरे वय - ५६ वर्षे धंदा शेती, २.मारोती पि. गंगाधर मोरे, वय-३३ वर्षे धंदा शेती,३.सिध्दार्थ पि. गंगाधर मोरे, वय - ३५ वर्षे धंदा शेती,अर्जदार क्र. १ ते ३ रा. पोमनाळा, ता. भोकर, जि. नांदेड.४.आशाबाई भ्र. चंद्रकांत परटकर, वय-३९ वर्षे धंदा घरकाम, रा. बोरीगाव मंडळ वाटोळी, जि. आदिलाबाद (तेलं)५.कल्पना भ्र. अनिल सोनकांबळे, वय - ३६ वर्षे धंदा घरकाम, रा. कांडली, ता. भोकर, जि. नांदेड.

**विरूध्द**

**गैरअर्जदार :**-निरंक.

**दावा:**-भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम (३) मुंबई रेग्युलेशन प्रमाणे वारस व उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ दिनांक यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील मयत गंगाधर केरबा मोरे यांचा मृत्यू ३०/०३/२०१२ रोजी पोमनाळा, ता. भोकर, जि. नांदेड येथे झाला असून त्यांच्या मृत्यूपत्राआधारे वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एम. पि. पेदे यांच्यामार्फत अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदार यांच्या नावे मयतांचे मृत्यूपत्राआधारे वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरिता जर कोणाचा आक्षेप / उजर असल्यास त्यांनी सदर जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर, जि. नांदेड येथे आपण स्वतः, वकिलामार्फत हजर राहून लेखी स्वरूपात आपले म्हणणे / आक्षेप नोंदवावे, अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**लिपीक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,भोकर

स्वाक्षरित/-
**सहा.अधीक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,भोकर

**जाहीर प्रगटन**

**दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड यांच्या न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ३०२/२०२५**

**लक्ष्मीबाई भ्र. मारोतीराव ढेरे व इतर ४ वि. पदमीन भ्र. मारोतराव ढेरे व इतर २**

अर्जदार :-१. लक्ष्मीबाई भ्र. मारोतीराव ढेरे, वय - ७२ वर्ष, धंदा - घरकाम, २.बालाजी भ्र. मारोती ढेरे,वय - ३९ वर्ष, धंदा-शेती,३.गोविंद भ्र. मारोती ढेरे, वय-३७ वर्ष, धंदा-शेती,४.देविदास भ्र. मारोती ढेरे, वय - ४२ वर्ष, धंदा - शेती, अर्जदार क्र. १ ते ४ रा. कोळगाव (बु.), ता. भोकर, जि. नांदेड. ५.सुर्यकांताबाई भ्र. दिगांबर सोळंके, वय - ३५ वर्ष, धंदा - घरकाम, रा. पोमनाळा, ता. भोकर, जि. नांदेड.

**विरूध्द**

**गैरअर्जदार :**-१. पद्मीन भ्र. मारोतराव ढेरे,वय - ५५ वर्षे, धंदा - घरकाम,२. देवराव भ्र. मारोतराव ढेरे, वय - ३९ वर्षे, धंदा-शेती, दोघे रा. कोळगाव (बु.), ता. भोकर, जि. नांदेड. ३.भाग्यश्री सुधाकर शिंदे, वय - २९ वर्षे, धंदा - घरकाम, रा. अडा, पो. कांडली, ता. जि. हिंगोली.

**दावा :**-भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम (०३) प्रमाणे मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ आणि गैरअर्जदार क्र. १ यांचे पती तसेच अर्जदार क्र. २ ते ५ आणि गैरअर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील मयत मारोती देवराव ढेरे, यांचा मृत्यू दिनांक १५/०९/२०२५ रोजी त्यांच्या राहत्या घरी कोळगाव (बु.), ता. भोकर, जि. नांदेड येथे झाला असून त्यांच्या मृत्यूपत्राआधारे वारसा प्रमाणपत्र (Probate Certificate) मिळण्याकरिता अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. बि. व्ही. सुर्यवंशी यांच्यामार्फत अर्ज दाखल केला आहे.

सत्यप्रभा



संपादकीय

# विरोधी पक्षनेताविना "संसार"...!

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर उपराजधानी सोमवारपासून सुरू झाले. महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच दोन्ही सभागृहांमध्ये अधिकृतरित्या विरोधी पक्षनेता विनाच विधिमंडळाचा कारभार चालणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच विरोधी पक्ष नेतविना विधिमंडळाचा संसार चालेल असे चित्र दिसत आहे. खरेतर विरोधी पक्षाला आणि नेत्याला लोकशाहीच्या ''या'' मैदानात अधिवेशनात मोठे प्राबल्य आहे .महत्त्व आहे .कारण विरोधी पक्ष जर मजबूत असेल तर सरकारला धारेवर धरण्याचे तो लोकशाही पद्धतीने काम करू शकेल. सरकारच्या मनमानी कारभाराला तो रोखू शकेल. या मुद्द्यांवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषणात म्हटले आहे , जर विरोधी पक्ष नसेल किंवा त्याचे अस्तित्व संपुष्टात येत असेल तर लोकशाहीला धोका निर्माण होऊ शकतो. सत्तेच्या राजगादीवर बसणारा ''राजा'' हा हुकूमशाही पद्धतीने वावरू शकेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली होती. त्यासाठी अधिवेशनात विरोधी पक्षांची भूमिका ही महत्त्वाची ठरू शकते. सरकारच्या हुकूमशाहीला आणि मनमानी कारभाराला लगाम लावू शकते. त्यासाठी विरोधी पक्ष हा सत्तेमध्ये मजबूत असायला पाहिजे. अशी लोकशाहीची धारण आहे. परंतु जर विरोधी पक्षच नसेल तर लोकशाहीचा कारभार हा पारदर्शक पद्धतीने चालू शकेल काय, यावर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. नागपूर अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आजची विरोधी पक्ष पदाची स्थिती लक्षात घेता विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदासाठी आवश्यक २९ आमदारांचा आकडा कोणत्याही पक्षाला गाठता आलेला नाही. ठाकरे सेनेचे २०, काँग्रेसचे १६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे १० आमदार आहेत. यावरच ठाकरे गटाचे आमदार सुनिल प्रभु यांनी टीका केली होती. त्यामुळे राजकीय वर्तुळात वादळ निर्माण झाले आहे. सरकारचं मत ऐकण्यासाठी विधिमंडळामध्ये विरोधकांचे कोणीतरी असायला हवें आहे, परंतु तसे नसेल तर सरकारलाही आपले मत मांडण्यासाठी आपला ''आवाज ''कसा घुमविणानार हाही प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. आजच्या परिस्थितीत विधानपरिषदेतही २९ ऑगस्ट २०२५ पासून हे पद रिक्त असल्याने, दोन्ही सभागृहांचे कामकाज विरोधी पक्षनेत्याशिवाय असणार आहे. याविषयी आश्चर्य व्यक्त केल्या जात असले तरी यावर लोकशाहीतून तोडगा काढणे अत्यंत गरजेचे आहे. आज विधिमंडळासमोर लोकशाही मार्गाने होणारी आंदोलने हे नागपुरात होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचे वेगळेपण आहे. त्यामुळे राज्यभरातील संघटना हिवाळी अधिवेशनात आपल्या मागण्या सरकारपुढे मांडण्यासाठी तयारी करत असतात. त्यांचे प्रश्न आणि समस्या खऱ्या अर्थाने विरोधी पक्षांच्या माध्यमातून सरकारपर्यंत कशा पोहोचतील. किंवा सरकार कशा पद्धतीने त्यांच्या मागण्या स्वीकारतील आणि आपला विचार करतील, हेही मत विचारात घेणे अत्यंत गरजेचे आहे. आज अधिवेशनाच्या संपूर्ण कालावधीत नागपुरात होणाऱ्या आंदोलनांसाठी राज्यभरातून लोक येत आहेत. त्यामुळे अधिवेशन काळात या शहराचे वेगळे अर्थकारणही आंदोलनांवर अवलंबून आहे त्यामुळे अधिवेशनाला सुरुवात होताच पहिल्याच दिवशी ४ मोर्चे, २ आत्मदहनाचे इशारे, १५ धरणे आणि ९ उपोषण आंदोलने समोर आली आहेत. त्या दृष्टिकोनातून नागपूर येथे आंदोलकांची बांधणी सुरू झाली आहे. त्यामुळे पहिल्या दिवसापासूनच शहर मोर्चेकरी, आंदोलकांच्या गर्दीने गजबजले आहेत. यावर्षी कष्टकरी, श्रमिकांच्या संघटनांनी हिवाळी अधिवेशनात आंदोलनांसाठी आयुक्तालयाकडे परवानगी मागितली आहे. राजकीय पक्षांकडून तीन मोर्चे विधिमंडळ अधिवेशनावर धडकणार आहेत. तर एका पक्षाने साखळी उपोषणाची परवानगी पोलिसांकडे मागितली आहे.यंदाचे हे अधिवेशन आठच दिवसांचे असले तरी ते नेहमी प्रमाणे वादळी ठरणार हे निश्चित आहे. संपूर्ण आठ दिवसांत शहरातमध्ये हिवाळी अधिवेशन काळात विधिमंडळावर ३२ मोर्चे धडकतील. या खेरीज अधिवेशन काळात २० धरणे आंदोलने होतील. सोबतच १७ डिसेंबर पर्यंत एक आठवडा चालणाऱ्या अधिवेशन काळात १६ उपोषण आंदोलने होतील. एनवेळी यात राजकीय पक्षांकडून होणारी आंदोलने वाढतील, अशी शक्यता असली तरी नागपूर या ठिकाणी मोठ्या बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.पहिल्या दिवशी पवित्र पोर्ट अभियोग्यता प्रक्रिया जलदगतीने पार पाडावी ,या मागणीसाठी युवा शैक्षणिक सामाजिक न्याय संघटना, विनाअनुदानीत दिव्यांग शाळांना १०० टक्के अनुदान द्या, या मागणीसाठी बीड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास मंच, दिंडोरा प्रकल्प ग्रस्तांना २४० कोटींचे पॅकेज द्या. या मागणीसाठी दिंडोरा बॅरेज प्रकल्पग्रस्त आंदोलन समिती तर संजय गांधी निराधार योजनेचा लाभ ५ हजारापर्यंत वाढवा ,या मागणीसाठी विदर्भ विकलांग समिती अधिवेशनावर मोर्चाची तयारी झालीआहे.त्या दृष्टिकोनातून नागपूर शहर गजबजलेले आहे. हे अधिवेशन विविध मागण्यांसाठी आणि जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी किती पर्यंत सक्षम असेल हे आपणाला दिसून येईल. त्यामुळे विधिमंडळ हे वादळी स्वरूपातच आपणाला पहावयास मिळेल ,अशी अपेक्षा आहे. विरोधी पक्ष नेत्याविना विधिमंडळाचा संसार कशा पद्धतीने पुढे रेटल हे ही जनता आता पाहणार आहे.

# केरळला गरिबीमुक्ती जमली, इतर राज्यांना जमेल?

– महेश जोशी

**भारतातील पहिले पूर्ण साक्षर राज्य असलेल्या केरळने आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. केरळ हे भारतातील पहिले अत्यंत दारिद्र्यमुक्त राज्य बनले आहे. मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांनी ही घोषणा केली. आता प्रत्येकाच्या मनात प्रश्न आहे, की केरळने अत्यंत दारिद्र्यमुक्त करण्यासाठी नेमके काय केले? त्यातून इतर राज्ये काय शिकू शकतील?**



गेल्या पाच वर्षांपासून केरळ राज्य ज्या योजनेवर काम करत होते, ती अखेर तडीस गेली आहे. आत्यंतिक गरिबीचा शाप खोडून काढण्यात केरळला यश आले आहे. सर्वात साक्षर, सर्वात स्वच्छ आणि सर्वात आधी आत्यंतिक गरिबीतून सुटका हे मानदंड केरळने घालून दिले. त्यामागे चार प्रमुख सरकारी सूत्रे आहेत. २०२१ मध्ये मुख्यमंत्री विजयन यांनी विधानसभेत सांगितले होते, की भारतातील पहिले अत्यंत दारिद्र्यमुक्त राज्य बनणे हे आपले स्वप्न आहे. २०२१ मध्ये दुसऱ्यांदा सत्तेत आलेल्या 'एलडीएफ' सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयांचे हे परिणाम आहेत. त्यांनी या यशाचे श्रेय अत्यंत दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम (ईपीईपी) तसेच लोकसहभाग आणि स्थानिक संस्था- सरकारी विभागांच्या समन्वित प्रयत्नांना दिले. यासाठी आशा कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था आणि नागरी समाज नेटवर्कची मदत घेण्यात आली. प्रत्येक कुटुंबासाठी सूक्ष्म योजना विकसित करण्यात आल्या. त्यांचे स्वतंत्रपणे वर्गीकरण करुन अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन सहाय्य योजना विकसित करण्यात आल्या.

केरळ सरकारने या कुटुंबांसाठी नियमित जेवण, निवास, आरोग्य सेवा, औषधे आणि विम्याची व्यवस्था करण्यात आली. मुलांना शिष्यवृत्ती, अभ्यास साहित्य आणि मोफत प्रवास पास प्रदान करण्यात आले. मनरेगा 'जॉब कार्ड'द्वारे रोजगार सुनिश्चित करण्यात आला. ओळखपत्र नसलेल्यांना रेशन कार्ड, आधार आणि पेन्शन योजनांशी जोडले गेले. गृहनिर्माण, जमीन, पेन्शन आणि वैद्यकीय सुविधा प्रदान करण्यात आल्या. अंदाजे ६२ लाख कुटुंबांना कल्याणकारी पेन्शन प्रदान करणे, अंदाजे चार लाख सत्तर हजार बेघर कुटुंबांना घरे देणे, अंदाजे सहा हजार सार्वजनिक आरोग्य केंद्रे स्थापन करणे, ४३ लाख कुटुंबांना मोफत आरोग्य विमा प्रदान करणे आणि चार लाख कुटुंबांना जमीन प्रदान करणे यासारख्या उपाययोजनांमुळे केरळमधील अत्यंत गरिबीची व्याप्ती आणि तीव्रता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. या मोहिमेवर राज्य सरकारने एक हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च केला. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात या मोहिमेसाठी अतिरिक्त ६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. या सातत्यपूर्ण प्रयत्नातून लोकांना अत्यंत गरिबीतून बाहेर काढण्यात आले. विरोधकांनी त्यावर टीका केली असली, तरी सरकारने एखादा निर्णय घेऊन त्या दृष्टीने नियोजनबद्ध पाऊल उचलणे अतिशय महत्त्वाचे होते. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट' (यूडीएफ) ने सरकारच्या दाव्याला फसवणूक म्हटले आहे.

**पारदर्शक प्रक्रिया**

ही असाधारण कामगिरी करणारे केरळ हे भारतातील पहिले राज्य आहे. ही केवळ एक आकडेवारी नाही, तर लाखो कुटुंबांसाठी आशेचा उदय आणि समावेशक समाज निर्माण करण्याचा विषय आहे. एके काळी उपासमार आणि वंचिततेने वेढलेली घरे आता स्वाभिमान आणि समृद्धी पसरवत आहेत. ही कामगिरी केरळच्या सामाजिक न्यायाच्या गौरवशाली परंपरेचा कळस दर्शवते, जी १९५७ च्या ऐतिहासिक जमीन सुधारणांपासून आजच्या डिजिटल क्रांतीपर्यंत पसरलेली आहे. हा प्रवास अडचणींनी भरलेला होता, तरीही दृढनिश्चय, सामूहिक प्रयत्न आणि अढळ संकल्पाने ते शक्य केले. हेतू स्पष्ट असेल आणि इच्छाशक्ती अढळ असेल तर गरिबी निर्मूलन अशक्य नाही. नीती आयोगाच्या २०२३ च्या अहवालात केरळ हे राज्य देशातील सर्वात कमी बहुआयामी दारिद्र्यदरासह अव्वल क्रमांकावर होते. तो दर ०.५५ टक्के होता; परंतु हा आकडा सरकारसाठी थांबण्याचे निमित्त बनला नाही. त्याऐवजी, एक अभूतपूर्व सर्वेक्षण मोहीम सुरू करण्यात आली. अत्यंत गरिबी, म्हणजेच एक दयनीय परिस्थिती, जिथे एखाद्या व्यक्तीला दररोज १८० रुपयांपेक्षा कमी उत्पन्नावर जगण्यास भाग पाडले जाते, जिथे अन्न, आरोग्य, निवारा आणि शिक्षण यासारख्या मूलभूत गरजा अजूनही एक दूरचे स्वप्न राहिले आहेत. या आव्हानाला तोंड देण्यासाठी सरकारने एकसमान धोरण लादण्याऐवजी प्रत्येक कुटुंबासाठी वैयक्तिक सूक्ष्म योजना विकसित केल्या. स्थानिक स्वराज्य संस्था, कुडुम्बश्रीसारखे सक्षम महिला गट आणि सामाजिक संस्थांना या मोहिमेत सहभागी करून घेण्यात आले. परिणामी, ५९ हजार २७७ कुटुंबांना गरिबीतून बाहेर काढले गेले. अन्न सुरक्षेसाठी वीस हजार ६४८ कुटुंबांसाठी दररोज रेशन आणि दोन हजार २१० कुटुंबांसाठी शिजवलेले जेवण सुनिश्चित करण्यात आले.

**भूमिहीनांना जमीन**

केरळ सरकारतर्फे आरोग्य क्षेत्रात ८५ हजार ७२१ लोकांना वैद्यकीय मदत देऊन औषधे प्रदान करण्यात आली. पाच हजार चारशे नवी घरे बांधण्यात आली. पाच हजार ५२२ जुन्या घरांचे नूतनीकरण करण्यात आले आणि दोन हजार ७१३ भूमिहीन कुटुंबांना जमीन देण्यात आली. रेशन कार्ड आणि आधार कार्डसारख्या कागदपत्रांसह शिक्षण, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. रस्ते आणि पुलांच्या पलीकडे लोकांचे जीवन आणि स्वप्ने सुधारण्यासाठी सरकारने एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक केली. ९६.२ टक्के साक्षरता, कमी बालमृत्यू दर आणि संपूर्ण विद्युतीकरणासह केरळने सिद्ध केले, की लोकांचे हास्य आणि आशा हे विकासाचे खरे माप आहे. राज्यांपुढे अनेक आव्हाने असतात, मात्र त्यामुळे अधिक समावेशक, मजबूत आणि प्रेरणादायी योजना बनविण्याचा मार्ग मोकळा करतात. त्यामुळे केरळला जे जमले ते इतर राज्यांना का जमणार नाही ?

निमित्त

# भ्रष्टाचारामुळे राष्ट्रीय विकासावर परिणाम



**आज सर्वत्र भ्रष्टाचाराला सामोरे जावे लागते. त्यात भारत हा अपवाद नाही, तर ही आंतरराष्ट्रीय समस्या आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केलेला ९ डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन जगभर पाळला जातो. या निमित्ताने भ्रष्टाचार कमी करण्यासंदर्भात काही उपाययोजनांचा उहापोह होतो.**

भ्रष्टाचाराच्या वाढत्या प्रकरणांमुळे प्रशासन, सार्वजनिक सेवा, स्थानिक स्वराज्य संस्था, न्यायव्यवस्था, नागरिक व समाज यांचे पारस्परिक नाते प्रभावित होते तेव्हा त्याचा परिणाम केवळ आर्थिक किंवा कायदेशीर मर्यादेपुरता राहत नाही, तर सामाजिक संरचना, विश्वास, पारदर्शकता आणि न्याय या मूल्यांवर खोलवर होतो. २०२३ मधील नॅशनल क्राइम रेकॉर्डस् ब्युरोच्या अहवालानुसार, भारतात भ्रष्टाचाराची ४,०६९ प्रकरणे नोंदवली गेली. त्यापैकी ७१ टक्के प्रकरणे ''ट्रॅप'' प्रकारात होती. ''ट्रॅप'' प्रकारात पकडलेली प्रकरणे हे फक्त उदाहरण आहेत. मात्र, हजारो ठिकाणी भ्रष्टाचार घडतो पण नोंद होत नाही, अशा व्यवहारांचा समावेश या आकड्यांमध्ये नाही.

आजच्या काळात भ्रष्टाचाराचे स्वरूप बदलले आहे. आर्थिक गुन्हे, सायबर गुन्हे, डिजिटल फसवणूक, व्यावसायिक व्यवहारातील भ्रष्टाचार वाढला आहे. २०२३ मध्ये आर्थिक गुन्ह्यांची नोंद २०२२ च्या तुलनेत ६ टक्क्यांनी वाढली, तर सायबर गुन्ह्यांमध्ये ३१.२ टक्क्यांची वाढ झाली. एकूण ८६,४२० प्रकरणे नोंदली गेली. या सायबर प्रकरणांपैकी अंदाजे ६९ टक्के प्रकरणे फसवणुकीची होती. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, सार्वजनिक यंत्रणा पारदर्शक व उत्तरदायित्व राखत नाहीत तेव्हा नागरिकांचा विश्वास कमी होतो. तेव्हा लोक वैध प्रक्रियांच्या ऐवजी अवैध मार्गांकडे वळतात. हा फक्त व्यक्तिगत नैतिकतेचा प्रश्न नाही; ही संस्थात्मक आणि सामाजिक समस्या बनते. अशा परिस्थितीत, गरीब, अल्पसंख्याक, मागासलेले वर्ग हे सर्वात जास्त प्रभावित होतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण किंवा शहरी गरीब लोकांना सरकारी सेवा, परवाने, योजना मिळवण्यासाठी आवश्यक माहिती, संपर्क, संसाधने नसतात. त्यामुळे त्यांना अवैध मार्गाचा अवलंब करावा लागतो. परिणामी, सामाजिक विषमता वाढते, न्याय कमी होतो आणि समान संधींचा अभाव निर्माण होतो. भ्रष्टाचारामुळे हे सामाजिक असमानता आणि विषमता आणखी खोलवर रुजते.

शहरी व ग्रामीण परिस्थितींचा आढावा घेतल्यास, ग्रामीण भागात भ्रष्टाचाराचे स्वरूप मुख्यतः सरकारी योजनांमध्ये घोटाळा, पंचायत स्तरावरील गैरव्यवहार, जमीन व्यवहारातील अनियमितता, परवाने मिळवण्यात रस्सीखेच इत्यादी प्रकारात दिसते. शहरी भागात भ्रष्टाचार आर्थिक व्यवहार, व्यावसायिक व्यवहार, परवाने, सार्वजनिक सेवा, ऑनलाईन व्यवहार यामध्ये अधिक प्रमाणात आहे. शिक्षण आणि जागरूकतेचा अभाव भ्रष्टाचार वाढवण्यास हातभार लावतो. अशिक्षित, सामाजिक साक्षरतेचा अभाव, नागरी अधिकारांची माहिती नसणे हे घटक लोकांना भ्रष्टाचाराच्या जाळ्यात सहज ओढून नेतात. भ्रष्टाचाराचा प्रभाव आर्थिक विकासावरही पडतो. गुंतवणूक कमी होते, व्यवसायिक वातावरण अनिश्चित बनते, सेवा वितरण धिमे होते, आणि विकासाच्या योजनांचा परिणाम कमी होतो. परिणामी, सामाजिक आर्थिक विषमता वाढते. त्यामुळे भ्रष्टाचाराला लगाम घालणे शासन व समाजाचे सामूहिक कर्तव्य आहे.

–डॉ. राजेंद्र बगाटे
(मो. ९९६०१०३५८२)

जगाच्या पाठीवर

# मॅरेथॉन स्पर्धेत 'हिजाब'वाद



महिलांच्या पोशाखासंबंधित कायद्यांमुळे इराणमध्ये पुन्हा एकदा वादंग निर्माण झाला आहे. पर्यटनस्थळ असलेल्या किष बेटावर आयोजित मॅरेथॉन स्पर्धेत काही महिलांनी हिजाब घातला नसल्याने दोन मुख्य आयोजकांना अटक करण्यात आली आहे. सार्वजनिक शालीनता कायद्याचे उल्लंघन केल्याच्या आरोपावरून कारवाई केल्याची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली. या मॅरेथॉनमध्ये सुमारे पाच हजार धावपटूंनी सहभाग घेतला होता. महिलांसाठी स्वतंत्र शर्यत होती. मात्र स्पर्धेच्या व्हायरल झालेल्या काही छायाचित्रांमध्ये काही महिला धावपटू हिजाबशिवाय धावताना दिसल्या. इराणमध्ये महिलांना हिजाब परिधान करणे अनिवार्य आहे. यामुळे या फोटोंकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले व तत्काळ कारवाईचे आदेश देण्यात आले. अटकेतील दोघांपैकी एक 'किष फ्री झोन'प्राधिकरणात अधिकारी असून दुसरा स्पर्धा आयोजक खाजगी संस्थेचा प्रतिनिधी आहे. या स्पर्धेच्या आयोजकांना हिजाबच्या नियमांचे पालन करण्यास सांगितले होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप प्रशासनाने केला आहे. या अटकेनंतर इराणमध्ये प्रतिक्रिया उमटत आहेत. पारंपरिक बंधनं झुगारून महिलांनी मुक्तपणे सहभाग घेतल्याचे काहींनी स्वागत केले. त्यांच्यामते, क्रीडा क्षेत्रात महिलांना समान संधी मिळाव्यात आणि त्यांच्या पोशाखाबाबत कठोर निर्बंध असू नयेत. तर दुसऱ्या बाजूला, कट्टरवादी घटकांनी हे सार्वजनिक शालीनतेचा भंग, असल्याचे म्हणत आयोजकांना कडक शिक्षा देण्याची मागणी केली. इराणमध्ये मागील दोन वर्षांपासून हिजाब हा मुद्दा संवेदनशील ठरला आहे. महसा अमिनी यांच्या मृत्यूनंतर देशभरात मोठे आंदोलन झाले होते. त्यानंतर महिलांचे स्वातंत्र्य, पोशाख आणि मूलभूत अधिकारांच्या मुद्द्यांवर आंतरराष्ट्रीय स्तरावर इराणवर टीका झाली. या पार्श्वभूमीवर ताज्या घटनेचे महत्त्व आणखी वाढले आहे. किष बेटावरील ही मॅरेथॉन आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध होऊ शकली असती. परंतु हिजाब वादामुळे स्पर्धेची प्रतिमा मलीन झाली आहे. क्रीडाक्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवण्याची गरज सर्वत्र अधोरेखित केली जात असताना अशा प्रकारामुळे महिला स्वातंत्र्यावरील निर्बंध आणखी ठळकपणे अधोरेखित होत असल्याची टीका होत आहे.

आयुष्य बदलणारे शास्त्रज्ञ

# सर एम. व्ही. विश्वेश्वरैया

भारताच्या अभियांत्रिकी शाखा इतिहासात सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरैया यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. उच्च गुणवत्तेचे अभियंता, द्रष्टे नियोजक, आधुनिक भारताची पायाभूत रचना करणारे शिल्पकार आणि उत्कृष्ट प्रशासक म्हणून त्यांचे कार्य अद्वितीय आहे. १५ सप्टेंबर १८६० रोजी कर्नाटकमधील मुडदेन्श्वरमध्ये जन्मलेल्या या अभियंत्याने भारतातील जलसंपदा, सिंचन, पूल, धरणे आणि नागरी पायाभूत सुविधा या क्षेत्रात नवे मापदंड निर्माण केले. त्यांनी बांधकाम तंत्रज्ञानात अनेक नवे प्रयोग व सुधारणा केल्या. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत. कृष्णराज सागर धरणासाठी त्यांनी 'ऑटोमॅटिक स्लूइस गेट्स' ही प्रणाली विकसित केली. पाण्याच्या दाबानुसार आपोआप उघडझाप ही यंत्रणा त्या काळी जगातील प्रगत जलव्यवस्थापन तंत्रज्ञान ठरले. सिंचनासाठी त्यांनी 'ब्लॉक सिस्टम' लागू केली. यामुळे पाण्याचे नियोजनबद्ध विभाजन करून शेतीला योग्य तेवढे आणि समान पाणी दिले जायचे. नागरी नियोजनातील नवकल्पना राबवून आधुनिक बंगळुरूचे निर्माण केले. त्यामुळेच आज बंगळुरू आज 'भारताची सिलिकॉन व्हॅली' म्हणून ओळखले जाते. त्या काळात धरणांमध्ये लाकडी पट्ट्यांचा वापर होत असे. त्यांनी लाकडाऐवजी स्टीलच्या मजबूत स्लाइडिंग गेट्सची कल्पना मांडली, जी पुढे भारतातील अनेक धरणांमध्ये वापरली गेली. या नवकल्पना आणि बांधकाम तंत्रज्ञानातील प्रयोगांमुळे संपूर्ण मानवजातीला अनेक थेट व अप्रत्यक्ष लाभ मिळाले आहेत. पाण्याचे प्रभावी नियोजन, कृषी विकास, औद्योगिक प्रगती, नागरी विकास यातून साध्य झाला. त्यांच्या प्रयोगामुळे भारताची धरणे, रस्ते, इमारती, स्वच्छता, पाणीपुरवठा, स्वच्छता यासह नगर नियोजन या क्षेत्रात आश्चर्यकारक प्रगती झाली. भारताच्या विकासात्मक वाटचालीत सक्रिय योगदान दिल्याने त्यांना भारताचा सर्वोच्च सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात आला. ते केवळ अभियंता नव्हते, तर विकासाचे द्रष्टे विचारवंत होते. त्यांच्या प्रयोगांनी आजही अभियांत्रिकी, शेती, जलसंपदा आणि शहर नियोजनाला दिशा दिली आहे. मानवजातीसाठी सुरक्षित, प्रगत आणि टिकाऊ विकासाचा मार्ग त्यांनी दाखवून दिला आहे.



# सुंदर हस्ताक्षर हा व्यक्तिमत्त्वाचा आरसा




कुमारांशी हितगुज

**डॉ. सुरेश सावंत**
(ज्येष्ठ साहित्यिक)

आपण शाळेत शिकत असताना आपल्याला नेहमी सांगितले जाते की सुंदर हस्ताक्षर काढा. आम्ही शाळेत शिकत असताना आमचे हस्ताक्षर बघून आमचे गुरुजी म्हणायचे, काला अक्षर भैंस बराबर! गिचमीड अक्षरांची टिंगल केली जायची. अक्षर चांगले यावे, यासाठी पुन्हा पुन्हा घोटून लिहायला सांगितले जायचे. सुंदर हस्ताक्षर म्हणजे केवळ अक्षरे व्यवस्थित लिहिणे नव्हे, तर ते आपल्या व्यक्तिमत्त्वाचे एक महत्त्वाचे प्रतिबिंब आहे. सुंदर हस्ताक्षर आपल्याबद्दल इतरांना सकारात्मक संदेश देते. ते आपल्याला शिस्तबद्ध, संयमी आणि स्वच्छतेची आवड असलेली व्यक्ती म्हणून दर्शवते. आपले हस्ताक्षर सुंदर असेल तर आपले विचार अधिक स्पष्टपणे मांडता येतात आणि इतरांना ते वाचायला सोपे जाते. चांगल्या हस्ताक्षरामुळे आपले काम अधिक प्रभावी दिसते. सुंदर हस्ताक्षर हा एक दागिनाच असतो.

मी जेव्हा पाचवीत होतो, तेव्हा माझे हस्ताक्षर खूपच खराब होते. मला लिहायला अजिबात आवडायचे नाही आणि माझे शिक्षक नेहमी मला ओरडायचे. मला वाटायचे की, 'फक्त चांगले गुण मिळाले तर काय हरकत आहे?' पण एकदा माझ्या मराठीच्या शिक्षकांनी मला बोलावले आणि सांगितले, ''चांगले हस्ताक्षर हे ज्ञानाचे दार उघडते. सुंदर हस्ताक्षर हेच मनुष्याचे भूषण आहे.'' म्हणजेच, हस्ताक्षर हेच माणसाचे खरे सौंदर्य आहे. त्यांनी मला रोज अर्धा तास हस्ताक्षर सुधारण्याचा सराव करण्यास सांगितले. मी सुरुवातीला कंटाळा केला, पण नंतर मी रोज नियमितपणे सराव




करू लागलो. मी अक्षरांना योग्य आकार देऊ लागलो. शब्दांमध्ये योग्य अंतर ठेवू लागलो. हळूहळू माझे हस्ताक्षर सुंदर होऊ लागले. आता माझे हस्ताक्षर सुंदर आहे आणि मला लिहायला खूप आवडते. माझ्या सुंदर हस्ताक्षरामुळे मला अनेकदा वर्गात आणि शाळेत प्रशंसा मिळाली आहे.

समर्थ रामदास स्वामींनी सुंदर हस्ताक्षरासंदर्भात 'दासबोध' ह्या ग्रंथात लिहिले आहे :

बालके बाळबोध अक्षर । घडसुनी करावे सुंदर
जे देखताचि चतुर । समाधान पावती ।
अक्षरमात्र तितुके नीट । समस्त पैस काने वीर
आडक्या मात्र त्याही नीट । आर्कुली वेलाह्या ।'
ज्याचे वय आहे नूतन । त्याने ल्याहावे जपोन ।
जनासी पडे मोहन । ऐसे करावे ।

**हस्ताक्षर सुधारण्यासाठी ह्या गोष्टी करून पाहा :**

१) हस्ताक्षर चांगले येण्यासाठी चांगला पेन वापरावा.

२) हातातील पेन हाताच्या स्नायूंवर ताण येणार नाही, अशा पद्धतीने सहजतेने पकडावा.

३) ज्या कागदावर लिहीत आहात, तो कागद तुमच्या सोयीने ठेवावा.

४) 'दिसामाजी थोडे तरी लिहावे' हा रामदास स्वामींचा मंत्र लक्षात ठेवा म्हणजे, लेखनाचा नियमित सराव करावा.

५) रेषा मारलेला कागद वापरला, तर ओळी सरळ येतात, नाही तर वेड्यावाकड्या होतात.

६) हस्ताक्षराच्या बाबतीत कोणाचीही नक्कल करू नका. तुमची स्वतःची शैली विकसित करा, कारण तुमचे हस्ताक्षर हे तुमच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असते.

सुंदर हस्ताक्षर केवळ अभ्यासातच नाही, तर जीवनातील अनेक क्षेत्रांमध्ये मदत करते. जेव्हा आपण अर्ज लिहितो, पत्र लिहितो किंवा कोणतेही महत्त्वाचे दस्तऐवज लिहितो, तेव्हा सुंदर हस्ताक्षरामुळे आपले काम अधिक प्रभावी दिसते. ते आपली ओळख निर्माण करते. सुंदर हस्ताक्षरामुळे आपल्यात आत्मविश्वासाची भावना येते. ते आपल्याला संयम आणि एकाग्रता शिकवते. हस्ताक्षर सुंदर करण्यासाठी नियमित सराव करणे, अक्षरांना योग्य आकार देणे आणि योग्य पद्धतीने पेन पकडणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपण आपल्या हस्ताक्षरावर लक्ष दिले पाहिजे, कारण ते आपल्या व्यक्तिमत्त्वाचे एक महत्त्वाचे अंग आहे.

**आता स्वतःला विचारा :**

तुमचे हस्ताक्षर सुंदर आहे का? नसेल तर ते सुधारण्यासाठी तुम्ही काय कराल?

सुंदर हस्ताक्षरामुळे तुम्हाला जीवनात कोणते फायदे मिळू शकतात असे वाटते?

सुंदर हस्ताक्षर हे व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब आहे असे तुम्हाला का वाटते?



# लेखकांना आवाहन

दैनिक सत्यप्रभासाठी विविध व प्रासंगिक विषयांवर लेख लिहून पाठवावेत. योग्य त्या लेखांना प्रसिद्धी देण्यात येईल. लेखकांनी आपला लेख युनिकोडमध्ये टाईप करून **dainiksatyaprabha2015@gmail.com** या मेलवर पाठवावेत.

**कार्यकारी संपादक**

सत्यप्रभा

हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक **शिवानंद दिंगबरराव महाजन** द्वारा प्रकाशित आणि मुद्रक **संदीप विलासराव पाटील**, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२

**संपादक : शिवानंद दिगंबरराव महाजन**

**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**

या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.

https://epaper.esatyaprabha.com

र.क्रं. २७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०

e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

## संक्षिप्त

### व्यंकुशहा महाराजांच्या यात्रोत्सवात पालखी

**सेलू :** सेलू नगरीचे ग्रामदैवत श्री केशवराज बाबासाहेब महाराज (व्यंकुशाह) यांच्या २२४ व्या यात्रा महोत्सवानिमित्त गुरुवारी शहरातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. गोपाळकृष्ण श्री केशवराज बाबासाहेब महाराज की जयच्या जयघोषाने आणि टाळ-मृदुंगाच्या गजराने सेलू शहर दुमदुमून गेले.दत्त जयंती हा यात्रेचा मुख्य दिवस असल्याने मंदिरात दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. फुलांनी सजवलेल्या पालखीचे मार्गावर ठिकठिकाणी फटाक्यांच्या आतषबाजीत स्वागत करण्यात आले.

### माता-बाल संगोपन रुग्णालय लवकरच कार्यान्वित

**बीड:** बीड जिल्हा रुग्णालय परिसरात २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत मंजूर झालेले १०० खाटांचे माता व बाल संगोपन रुग्णालय तब्बल २१ कोटी खर्चुन २०२३ मध्ये पूर्ण झाले. मात्र गेली दोन वर्षे निधीअभावी लिफ्ट फर्निचर, सिलिंग आणि ऑक्सिजन पाईपलाईनची कामे रखडली असल्याने ही इमारत धूळखात पडून होती. परंतु आता निधी मंजूर झाल्याने रुग्णालय कार्यान्वीत होण्याच्या प्रक्रियेला गती आली आहे. जिल्हा नियोजन समितीकडून खालीलप्रमाणे निधी मंजूर करण्यात आला.

### उदगीर वाळूप्रकरणी १६ जणांवर गुन्हे दाखल

**उदगीर :** शहरातील ग्रामीण व शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वेगवेगळ्या ठिकाणी २८२ ब्रास वाळू चोरट्या मार्गाने आणून विक्री करण्याच्या उद्देशाने साठवणूक केली होती. ती वाळू पोलिसांनी शुक्रवारी जप्त केली. तिची किंमत १४ लाख १० हजार रुपये आहे. याप्रकरणी ग्रामीण पोलिस ठाण्यात १० व शहर पोलिस ठाण्यात ६, अशा एकूण १६ जणांविरुद्ध शनिवारी पहाटे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही दिवसांपासून अवैध मार्गाने अनेक टिप्परमधून वाळूची चोरटी वाहतूक करण्यात येते.

### शासकीय कार्यालयातच स्वच्छतेचे तीनतेरा

**चाकूर :** चाकूर तालुक्यात स्वच्छता मोहिमेचा डंका पिटणाऱ्या प्रशासनाच्या शासकीय कार्यालयातच घाणीचे साम्राज्य पसरले असून स्वच्छतेचे तीन तेरा उडाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. तहसील कार्यालयाबरोबर पंचायत समिती कार्यालयाच्या माध्यमातून तालुक्याचा कारभार चालवला जातो. या कार्यालयात शासनाकडून स्वच्छतेसाठी अनेक मोहीमा, उपक्रम राबवले जातात. परंतु चाकूरच्या सर्व शासकीय कार्यालयातच सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरल्याने शासनाच्या सुंदर माझे कार्यालयाच्या मोहिमेचा चांगलाच फज्जा उडाला आहे.

## सर्दी, ताप, खोकला, श्वसनाचे आजार वाढण्याची शक्यता

# गारठा वाढला ; किमान तापमान १३ अंशांवर

वृत्तसंस्था । गंगापूर

डिसेंबर महिन्याची सुरुवात होताच गंगापूर तालुक्यातील तापमानात लक्षणीय घट पाहायला मिळत आहे. गेल्या २ दिवसांपासून वातावरणात अचानक गारवा वाढला असून, पहाटेची बोचरी थंडी नागरिकांना जाणवू लागली आहे. पहाटे तापमान तब्बल १३ अंशांपर्यंत घसरत आहे.

गंगापूर शहर व तालुक्यात अचानक पडलेल्या थंडीनंतर सायंकाळी तसेच सकाळच्या वेळी नागरिक ठिकठिकाणी शेकोट्या पेटवताना दिसून आले. बदलत्या हवामानामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आजारी पडण्याचा धोका वाढला आहे.

मागील महिन्यात उष्णतेनंतर काही दिवस गारवा जाणवल्यानंतर गत आठवड्यात पुन्हा उकाड्याची चाहूल लागली होती. मात्र दोन दिवसांपासून पुन्हा तापमानात घट होत असून, हवामानातील या बदलामुळे सर्दी, ताप, खोकला, श्वसनाचे आजार वाढण्याची शक्यता डॉ. राजेश गुडदे यांनी व्यक्त केली आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दमा, ॲलर्जी असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले.

थंडीपासून बचावासाठी सकाळ, संध्याकाळी बाहेर पडताना स्वेटर, शाल, जॅकेट, हातमोजे, पायमोजे वापरावेत. व्यायाम, जॉगिंग करताना उबदार कपड्यांचा वापर करावा. गूळ, तीळ, शेंगदाणा यासारखे हिवाळ्यातील पौष्टिक पदार्थ आहारात घ्यावेत. त्वचा कोरडी पडत असल्यास क्रीम व मॉइश्चरायझर नियमित लावावे. थंड पाणी व शीतपेय टाळावीत. तसेच लहान मुलांनी सकाळी लवकर घराबाहेर जाण्याचे टाळावे, असा सल्ला डॉ. रवींद्र ठवाळ यांनी दिला आहे.

### शेकोट्या पेटल्या

थंडीचा जोर पुन्हा वाढू लागला आहे सायंकाळी सहा वाजून पासूनच थंडी जाणून लागते यामुळे गावात ठिकठिकाणी शेकोट्या पेटू लागल्या आहेत. या शेकोट्याभोवती गर्दी होत आहे.



### शेतांमध्ये दवबिंदूंचे प्रमाण वाढले

शेतांमध्ये दवबिंदूंचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. मागील ८ दिवसांपूर्वी थंडीचा जोर कमी झाला होता. परंतु, दोन दिवसांपासून बऱ्यापैकी थंडी वाढली आहे. तर गहू, हरभरा, मका या पिकांसाठी थंडी पोषक ठरणार आहे. दरम्यान, अधिक थंड वातावरणाचा प्रभाव पिकांवर ही दिसून येत आहे. पुढील काही दिवस तापमानात आणखी घट होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.



## प्यांडल मारत परभणी ते मुंबई !

प्रतिनिधी । परभणी

कौटुंबिक वाचन संस्कृतीचा प्रसार आणि सामाजिक जनजागृतीचा वसा घेऊन निघालेली परभणी ते मुंबई सायकल यात्रा यशस्वीरीत्या पार पडली. एचएआरसीचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक यांनी सुमारे ६०० किलोमीटरचा टप्पा सायकलने पार करत मंत्रालयात या अनोख्या मोहिमेचा समारोप केला.दि. २९ नोव्हेंबर रोजी परभणीतून सुरू झालेली ही यात्रा जालना, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक, ठाणे या पाच जिल्ह्यांतून प्रवास करत २ डिसेंबरला मुंबईत पोहोचली. या चार दिवसांच्या प्रवासात डॉ. चांडक आणि त्यांचे सहकारी प्रकाश डुबे यांनी वाचन संस्कृतीचे बीज रोवण्यासाठी महत्त्व -पूर्ण कार्य केले.

केवळ प्रवास न करता या दोघांनी मार्गातील जिल्हा परिषद शाळा आणि महाविद्यालयांना भेटी दिल्या. लोकसहभागातून निवडक १० जिल्हा परिषद शाळांना प्रत्येकी ७५ पुस्तकांची आनंदी वाचनपेटी भेट देण्यात आली.

वाचनाची आवड निर्माण करण्यासोबतच मोबाईल व्यसनमुक्ती, सायकलचा वापर, एड्स जनजागृती, बेटी बचाओ-बेटी पढाओ आणि बालविवाह प्रतिबंध अशा विविध विषयांवर त्यांनी विद्यार्थी व ग्रामस्थांशी संवाद साधला.



## रब्बी हंगामातील सिंचनासाठी

# डाव्या कालव्यातून पाणी सोडल्याने शेतकऱ्यांना दिलासा

प्रतिनिधी । जालना

जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यातून रब्बी हंगामातील सिंचनासाठी नुकतेच पहिल्या आवर्तनाचे पाणी सोडण्यात आले. त्यात आता एक हजार क्युसेसने वाढ करण्यात आली आहे.दरम्यान, शुक्रवारी रात्री हे पाणी परिसरात पोचले आहे.या पाण्यामुळे तीन तालुक्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी दिलासा मिळणार आहे.

जायकवाडी धरण सध्या ९९.४५ टक्के भरलेले असून डाव्या कालव्यातून एक हजार क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरू आहे. शेतकऱ्यांनी डाव्या कालव्याला पाणी सोडण्याची मागणी केल्यानंतर जलसंपदा विभागाने तत्काळ पाणी सोडले आहे.२० ते २५ दिवस हे आवर्तन सुरू राहणार आहे. यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण, जालना जिल्ह्यातील अंबड, घनसावंगी, परतूर, परभणीमधील पाथरी, गंगाखेड आदी तालुक्यातील लाखो हेक्टर क्षेत्रातील गहू, हरभरा, कांदा यासह ऊस पिकाला फायदा होणार आहे.कुंभार पिंपळगावसह परिसरातील अनेक चाऱ्यांची दुरुस्ती करून खोलीकरण करण्यात आले आहे. यामुळे आता शेतकऱ्यांना बागायतीसाठी मोठा फायदा होणार आहे.

### एक हजार क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरू

ायकवाडी धरण सध्या ९९.४५ टक्के भरलेले असून डाव्या कालव्यातून एक हजार क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

# गाडीला धडक देत डोळ्यात चटणी टाकून २ लाखांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी । परळी

धारावती तांडा रोडवर जिम करून येणाऱ्या तरुणाच्या गाडीला धडक देऊन चाकूचा धाक दाखवून डोळ्यात चटणी टाकून २ लाख २० हजार रुपयाचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी ४ जणां विरुद्ध परळी ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल कारण्यात आला. चोरट्यांकडून झालेल्या या चोरीच्या घटनेमुळे परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

धारावती तांडा येथील यशवंत प्रेमदास पवार हे ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता हे व्यायाम करून परळीवरून धारावती तांड्याकडे मोटारसायकलवरून जात असताना, काळरात्री देवी मंदिर रोडवर एका बंद धाब्यासमोर दोन मोटारसायकलवरून आलेल्या चार आरोपींनी त्यांचा पाठलाग करत अचानक धडक दिली.तोंडाला मास्क लावून त्यापैकी एकाने चाकू दाखवून धमकावले, तर दुसऱ्याने त्यांच्या डोळ्यात चटणी टाकून त्यांना धरून ठेवले. त्याच्या गळ्यातील साडेतीन तोळ्यांची सोन्याची चैन आणि एक तोळ्याच्या दोन अंगठ्या हिसकावून चोरटे फरार झाले. साडेतीन तोळ्यांची सोन्याची चैन १ लाख ४० हजार रुपये, दोन सोन्याच्या अंगठ्या ८०,००० असे एकूण २ लाख २० हजार रुपयेचे किमतीचे साहित्य लुटून घेऊन पसार झाले.

## कारची दुचाकीला धडक, एक ठार

प्रतिनिधी । परतुर

तालुक्यातील वाटुर फाटा ते मंठा रोडवर भरधाव कारने दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिल्यामुळे झालेल्या भिषण अपघातात दुचाकी चालकाचा मृत्यू झाला.वाटर येथील करण गणेशराव खंडागळे (२०) हा युवक जेवणाचा डब्बा आणण्याकरीता जात असताना त्याच्या दुचाकीला पाठीमागुन भरधाव कार (क्रमांक एम. एच. ०४-३. एफ. ६८४०) ने जोरदार धडक दिली.या अपघातात हा युवक जागीच ठार झाला.

# अनियमितता आढळलेल्या चार कृषी केंद्राचे परवाने निलंबित

प्रतिनिधी । परभणी

रब्बी हंगामात शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण कृषी निविष्ठा उपलब्ध राहाव्यात तसेच साठेबाजी, जादा दराने विक्री आणि जबरदस्तीने इतर निविष्ठांची खरेदी लादणे यासारख्या गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी कृषी विभागाच्या भरारी पथकांमार्फत तपासणी मोहीम राबविण्यात आली. यावेळी अनियमिता आढळून आलेल्या गंगाखेड तालुक्यातील ४ कृषी केंद्रांचे निविष्ठा विक्री परवाने निलंबित करण्यात आले.

जिल्ह्यात निरीक्षके व भरारी पथकांनी केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने गुरुवारी (ता. ४) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दौलत चव्हाण यांचे दालनात सुनावणी आयोजित करण्यात आली होती.यावेळी जिल्ह्यातील ४ कीटकनाशके, ३ रासायनिक खते, ३ बी-बियाणे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत. ग्राहकांना योग्य दराने रासायनिक खत आणि कीटकनाशके मिळावे, साठा व विक्री यामध्ये पारदर्शकता राखावी, असे निर्देश जिल्हा कृषी विभागामार्फत देण्यात आले आहेत. जादा दराने कुठलीही निविष्ठा विक्री करू नये अन्यथा तत्काळ कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी चव्हाण यांनी दिला आहे.

## वडवणीपर्यंत लवकरच धावणार रेल्वे

# बीडपासूनच्या टप्प्याची लवकरच हायस्पीड चाचणी

प्रतिनिधी । बीड

जिल्हावासीयांचे स्वप्न असलेला अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचा अहिल्यानगर-बीड दरम्यानचा टप्पा पूर्ण झाल्यानंतर आणखी एक पुढचे महत्त्वाचे पाऊल पडले. या मागार्गावरील बीड-वडवणी टप्प्यावर रविवारी (ता. सात) मध्यम गती इंजिन चाचणी घेण्यात आली. ती यशवी झाली. १० व ११ डिसेंबरला या टप्प्यावर रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून लोहमार्ग तपासणी आणि हायस्पीड रेल्वे चाचण्या होणार आहेत.

अहिल्यानागर-बीड-परळी लोहमार्गाची मागणी ४० वर्षांपासूनची आहे. एकेकाळी ३५५ कोटी रुपयांच्या १६१ किलोमीटरच्या या मार्गाची किंमत ४८०० कोटी रुपयांवर पोचली आहे. या मार्गाचा निम्मा खर्च राज्य शासन उचलणार असल्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी घेतला होता. त्यानंतर काम सुरू झाले.विविध कारणांनी ते रखडत गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा मार्ग पटलावर घेतला.

### टप्पा २७ किलोमीटरचा

या मार्गावरील बीड-वडवणीदरम्यानचा पुढील २७ किलोमीटरटचा टप्पा पूर्ण झाला आहे. त्यावर शनिवारी (ता. सहा) मध्यम गती इंजिन चाचणी नियोजित होती. परंतु, इंजिन उपलब्ध न झाल्याने आज ही चाचणी यशस्वी झाली नाही. आता १०, ११ डिसेंबरला मार्ग तपासणी तसेच हायस्पीड इंजिन चाचणी केली जाईल. त्यानंतर अहिल्यानागर चे वडवणीपर्यंत रेल्वे धावेल.

## ट्रॅव्हल्सवर दुचाकीवरील चोरटे चढले, बॅगांची चोरी

# राष्ट्रीय महामार्ग ५२ वर प्रवाशांना लुटण्याच्या घटना वाढल्या

प्रतिनिधी । बीड

बीड ते तुळजापूरदरम्यान धावणाऱ्या ट्रॅव्हल्समधील प्रवाशांना लुटण्याच्या घटना राष्ट्रीय महामार्ग ५२ वर वाढल्या असून, गुन्हेगारांनी अक्षरशः 'सिनेस्टाईल' पद्धत वापरून पोलिस प्रशासनाला थेट आव्हान दिले आहे. बीड आणि धाराशिव जिल्ह्यांच्या हद्दीत पोलिसांचा कोणताही धाक उरलेला नसल्याचे या प्रकारावरून स्पष्ट झाले आहे.

लुटमारीमध्ये चोरटे एका दुचाकीवरून ट्रॅव्हल्सच्या पाठीमागे येतात. त्यातील एक चोरटा धावत्या गाडीवरून ट्रॅव्हल्सच्या कॅरिअरवर चढतो आणि प्रवाशांच्या बॅगा खाली फेकून देतो. दुसऱ्या दुचाकीवरील साथीदार त्या बॅगा जमा करतात आणि चढ किंवा गतिरोधक आल्यावर वेग कमी होताच पसार होतात. या धाडसी पद्धतीचा कथित सीसीटीव्ही व्हिडिओ व्हायरल झाला असूनही, महामार्गावर त्वरित उपाययोजना करण्यात पोलिस अपयशी ठरले आहेत. या गंभीर घटनांमुळे प्रवासी चांगलेच भयभीत झाले आहेत. पोलिस आणि प्रशासनाच्या डोळ्यादेखत अशा टोकाच्या घटना घडत असल्याने, महामार्गावरील गस्त पूर्णपणे कुचकामी ठरल्याचे दिसत आहे. पोलिसांनी तातडीने कठोर कारवाई न केल्यास प्रवाशांवरील हल्ले थांबणार नाहीत, अशी भीती व्यक्त होत आहे.

बीड जिल्ह्यात गुन्हेगारांनी पोलिसांना आव्हान देत दोन मोठ्या घटना घडवल्या. २४ नोव्हेंबर रोजी बळीराजा हॉटेलसमोर लग्नाहून परतणाऱ्या सोलापूरचे रहिवासी राजू राठी यांच्या गाडीतील १७ पैकी १० बॅगा चोरी झाल्या. या चोरीचा तपास अद्याप लागलेला नाही. दुसरीकडे, बुधवारी मध्यरात्री गेवराईजवळ राष्ट्रीय महामार्ग ५२ वर साईबाबांच्या दर्शनाला जाणाऱ्या तेलंगणा येथील भाविकांच्या कुटुंबाला लोखंडी रॉडचा धाक दाखवून लुटण्यात आले.


### पोलिसांकडून धोकादायक ठिकाणे जाहीर

बीड व धाराशिव पोलिसांनी १० धोकादायक ठिकाणांची यादी व्हायरल केली आहे. यात मांजरसुंबा घाट (बीड), चौसाळा बायपास, पारगाव बायपास, सरमकुंडी फाटा, इंदापूर फाटा, पार्डी फाटा, घुले माळ जवळील उड्डाणपूल, तेरखेडा ते येडशी टोल नाका, येडशी बायपास आणि धाराशिव ते तुळजापूर या प्रमुख भागांचा समावेश आहे.

## पाच रुपयांत ओटीजी केबल, चार हजारांत आयफोन!

# खरेदीसाठी बाजारात ग्राहकांच्या पडल्या उड्या

प्रतिनिधी । छत्रपती संभाजीनगर



अवघ्या पाच रुपयांत ओटीजी केबल आणि फक्त चार हजार रुपयांत आयफोन, आयपॅड मिळू शकतो यावर कुणाचा विश्वास बसत नसेल तर त्यांनी सरळ उठावे आणि जाफरगेट येथे भरणाऱ्या रविवारच्या बाजारात जावे. नट बोल्टपासून आयफोनपर्यंत कोणत्याही जुन्या वस्तू या बाजारात मिळतात. रविवारी (ता. सात) या बाजारात फेरफटका मारला असता इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सनी हा बाजार ओसंडून गेल्याचे दिसले.

मागील अनेक दशकांपासून जाफरगेट भागात भरणारा रविवारचा बाजार जुन्या वस्तूंच्या संग्राहकांसाठी आकर्षण असतोच. पण, स्वस्तात मिळणाऱ्या, वापरलेल्या वस्तूंसाठीही हा बाजार लोकप्रिय आहे. या बाजारात जुने रेडिओ, ग्रामोफोन, टेप रेकॉर्डर, ब्लॅक ॲण्ड व्हाइट टीव्हींचे पार्ट, टेलिफोन सेट, जुन्या सिनेमा सीडी, डीव्हीडी प्लेअर, संगीताच्या सीडी अशा वस्तू इथे रचलेल्या असतात.काही वस्तू बंद अवस्थेत असल्या तरी त्या फक्त 'आठवणी' म्हणून गोळा करण्यासाठी लोकं आवर्जून खरेदी करतात. अनेक ज्येष्ठ नागरिक या बाजारात खास जुन्या काळातील रेडिओ किंवा टेपरेकॉर्डर शोधण्यासाठी येतात. काही तरुण 'व्हिंटेज कलेक्शन' म्हणून या वस्तूंना पुन्हा नवे जीवन देताना दिसतात.विक्रेतेही सांगतात की दुर्बीण, जुने कॅमेरे आणि जुने रेडिओ, टेपरेकॉर्डर या वस्तूंची मागणी वर्षानुवर्षे कायम आहे. या बाजारात फेरफटका मारला असता अत्यंत स्वस्त दरात उपलब्ध होणारी इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सची अनेक दुकाने लक्ष वेधून घेत होती.

इयरबड्स, ब्लूटूथ स्पीकर्स, लॅपटॉप, आयपॉड, स्मार्टवॉच, चार्जर, मोबाइल फोन, टॅबलेट, संगणकाचे पार्ट, यूएसबी डिव्हाइस, सीसीटीव्ही, ड्रोनचे पार्ट येथे मांडून ठेवण्यात आले होते. ॲपल, सॅमसंग, सोनी, जेबीएल यांसारख्या महागड्या कंपन्यांच्या वस्तू बजेटफ्रेंडली दरात असल्याने अनेक तरुण या वस्तू स्वस्तात खरेदी करण्यासाठी गर्दी करत होते.काही वस्तू रिपेअर्ड असतात तर काही परफेक्ट कंडिशनमध्ये. त्यामुळेच अनेक तरुण हे ठिकाण 'गॅजेट हंटिंग स्पॉट' म्हणून वापरतात. ५० रुपयांची वस्तू १० रुपयांत मिळाली तर ग्राहकाला त्यातच समाधान मिळते. म्हणूनच खरेदीचे प्रमाण इतके जास्त आहे.' तर ग्राहक जुबेर दर्वेश यांनी सांगितले, 'हजार रुपयांच्या या वस्तू शंभर रुपयांत मिळाल्या. त्या फक्त सहा महिने जरी चालल्या तरी आपलाच फायदा आहे.

घरगुती भांडी, पितळ वस्तू, ट्रॅव्हल बॅग, शेतीची साधने, ड्रोन कॅमेऱ्यांचे पार्ट, साउंड स्पीकर आणि टीव्ही रिमोटपर्यंत सर्व वस्तू या बाजारात होत्या.

### पुस्तकेही विक्रीसाठी

या बाजाराचा आणखी एक आकर्षक भाग म्हणजे सेकंडहँड पुस्तकांची दुकाने. येथील पुस्तकांची किमतही अगदी परवडणारी असते. वाचनाची आवड असणाऱ्यांसाठी आणि स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक पुस्तके, जनरल नॉलेज, व्याकरण, मराठी आणि हिंदी कथा कादंबऱ्या, प्रेमकथा, रहस्यकथा, कवितासंग्रह अशी प्रचंड विविध पुस्तकेही येथे मिळतात.

## मॅरेथॉन | विजयी खेळाडूंना एकूण १ लक्ष ६० हजार रुपयांच्या रोख पारितोषिक

# रन फॉर हेरिटेजमध्ये ११०० धावपटूंचा सहभाग

वृत्तसंस्था । छत्रपती संभाजीनगर

महात्मा गांधी मिशनच्या वतीने रविवारी (दि.७) एमजीएम रन फॉर हेरिटेज मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांनी झेंडा दाखवून रन फॉर हेरिटेजचे उद्घाटन केले. यामध्ये वयोगटातील सुमारे ११०० धावपटूंनी सहभाग नोंदविला.

यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, ग्रामीणचे पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, महाराष्ट्र राज्य राखीव पोलिस बलाचे कामांडंट विक्रम साळी, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, उद्योजक डॉ. रणजित कक्कड, अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई आदी उपस्थित होते. शहरातील वारसा स्थळांबाबत जनजागृती करीत नागरिकांना या माध्यमातून एकत्रित केले जाते. एमजीएम मॅरेथॉनचे यंदाचे हे दहावे वर्ष होते.

या मॅरेथॉनमध्ये पुरुष आणि महिला गटामध्ये स्वतंत्रपणे १४ ते २०, २१ ते ३५ ३६ ते ४५, ४६ ते ५५, ५६ ते ६५ या वयोगटात ही स्पर्धा घेण्यात आली. सुमारे ११०० धावपटूंनी ५ किमी आणि १० किमी स्पर्धेत सहभाग नोंदविला. विविध गटातील प्रथम येणाऱ्या तीन स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पदक आणि रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे यावेळी मॅरेथॉनमध्ये सहभाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. या मॅरेथॉनमध्ये विजयी खेळाडूंना एकूण १ लक्ष ६० हजार रुपयांच्या रोख पारितोषिकांचे मान्यवरांचे हस्ते वितरण करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी प्रा. शशिकांत सिंग, डॉ. श्रीनिवास मोतीयेळे, डॉ. सदाशिव जव्हेरी, ऐश्वर्या आघाव, प्रा. रहीम खान, डॉ. अमरदीप असोलकर, बालाजी शेळके, जॉय थॉमस, अर्जुन तोडकर, लक्ष्मण सूर्यवंशी, सुनील चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.



### स्पर्धेतील विजेत्यांची नावे

पाच वेगवेगळ्या वयोगटात ही मॅरेथॉन पार पडली. यात दहा कि. मी. पुरुष गटातील स्पर्धांमध्ये गणेश पाखरे, विजय भोकरे, राकेश यादव, संतोष वाघ, भगवान कच्छवे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. तर दहा कि. मी. महिला गटात मनीषा पाडवी, गायत्री गायकवाड, विश्रांती गायकवाड, विठाबाई कच्छवे, आभा सिंग या प्रथम आल्या.

## अवैध वाळू वाहतूक करणारी दोन वाहने जप्त

प्रतिनिधी । जाफ्राबाद

तालुक्यातील बोरखेडी चिंच येथे अवैध वाळू वाहतूक करणारे विना नंबर एक टिप्पर व एक हायवा असे दोन वाहने शनिवार दि. ६ रोजी जप्त करण्यात आली आहे. या कारवाईत जप्त करण्यात आलेली अवैध वाळू घरकुल लाभार्थींना शासकीय नियमांनुसार वाटप करण्यात आली आहे.

दरम्यान, जाफराबाद तालुक्यात सर्रासपणे अवैध वाळू वाहतुक होत होती. या अवैध गौण खनिज, वाळू उत्खनन व वाहतुकीवर निर्बंध घालण्यासाठी महसूल व पोलीस विभागामार्फत संयुक्त मोहिम राबविण्यात येत आहे. तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीवर निर्बंध घालण्याच्या सूचना दिल्या आहेत.


## संक्षिप्त

### विनापरवाना देशीदारु बाळगली ;गुन्हा दाखल

**कंधार :** तालुक्यातील कौठा ते गडगा जाणाऱ्या रोडवर आरोपी गंगाधर मोहन पवळे हा विनापरवाना देशीदारु भिंगरी संत्रा हा बेकादेशीररित्या विक्री करण्यासाठी बाळगलेला आढळून आला. या प्रकरणी स्थागुशाखेच्या पो.कॉ. राजकुमार डोंगर यांनी कंधार पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन कंधार पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नारायण शेटे यांचे निधन

**लोहा :** जुना लोहा शहरातील नारायण देवराव शेटे वय ७० वर्षे



यांचे दि.८ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले ,दोन मुली ,नातू असा मोठा परिवार आहे.

### किशन वानखेडे यांचे निधन

**नांदेड :** तरोडा बु. परिरातील



ओंकारेश्वर नगर येथील किशन तुळशीराम वानखेडे वय ३५ यांचे दि. ८ डिसेंबर रोजी दुपारी हदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रात्री ९ च्या सुमारास बेटसांगवी ता. लोहा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ लहान मुलगा, १ मुलगी, आई, वडिल, २ विवाहित बहिणी असा परिवार आहे. दैनिक एकमतमधील कर्मचारी तुळशीराम वानखेडे यांचे ते चिरंजीव होते

### मंदाकिनी गोलेगावकर यांचे निधन

**नांदेड:**शहरातील अशोकनगर येथील ज्येष्ठ महिला सौ.मंदाकिनी गोविंदराव



गोलेगावकर यांचे दि.८ डिसेंबर रोजी सकाळी ९ वा. वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, मुलगी,सुना,जावई,नातवंडे असा परिवार आहे.

### जिजाबाई मेंडके यांचे निधन

**भोकर :** तालुक्यातील आमदरी येथील जिजाबाई



चंपतराव मेंडके (६५) यांचे दीर्घ आजाराने रविवार दि.७ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर सोमवार दि.८ डिसेंबर रोजी दुपारी त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती , दोन मुल, तीन मुली , सुना , जावाई , नातवंड असा परिवार आहे .

### अनुसयाबाई धबडगे यांचे निधन

**मुदखेड :**येथील श्रीमती अनुसयाबाई बाबाराव धबडगे



पाटील २९१) यांचे दि. ८ डिसेंबर सोमवार रोजी दुपारी ३.३० वाजता निधन झाले .त्यांच्या पार्थीवावर मंगळवार दि.९ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता हिंदु स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.त्यांच्या पश्चात चार मुले व एक मुलगी नातवंडं असा परिवार आहे


## सकाळी धुक्याची चादर अन दवबिंदूचा सडा

# नांदेड गारठले ;पारा १० अंशावर

प्रतिनिधी । नांदेड

शहरात थंडीचा कडाका वाढला असून गेल्या रविवारपासून थंडीची मोठी लाठ आली आहे. या थंडीचा जनजीवनावर चांगलाच परिणाम दिसुन येत असून नागरिक थंडीपासून बचाव करण्यासाठी प्रयत्न करतांना दिसत आहेत.

यावर्षी लांबलेल्या पावसामुळे आणि अतिवृष्टीमुळे थंडीचा कडाका अधिकच अधिक जाणवणार असल्याचा अंदाज अधिच वर्तवला गेला होता.मात्र नोंव्हेबर महिण्यात काही दिवसाचा अपवाद वगळ्यास फारसी थंडी जाणवली नव्हती.परंतू डिसेंबर उजाडताच थंडीने आपले रूप दाखवायला सुरूवात केली असून गेल्या दोन दिवसांत तर तापमानाचा पारा थेट १० अंशावर घसरल्यामुळे शहर वासिय चांगलेच गारठले आहेत.



### कमाल तापमानात घट

सध्या शहरातील कमाल तापमान १० ते १३ अंशापर्यंत राहत आहे. सकाळी १० वाजेपर्यंत हुडहुडी कायम राहत आहे.सायंकाळी ४ नंतरच नागरिक थंडीचा सामना करीत आहेत.या थंडीमुळे रात्री ९ नंतरच शहरातील वाहतूक विरळ होत आहे.

### पिकांना पोषक वातावरण

वाढत्या थंडीसोबत शहरात पहाटेला दाट धुक्याची चादर पसरत असल्याने उशीरापर्यंत दिवस उजडत नाही.त्याच प्रमाणे सकाळच्या सुमारास सर्वत्र दव बिंदूचा वर्षाव होतांना दिसून येत आहे. हे वातावरण रब्बीतील गहू, हरभरा,तसेच अन्य काही पिकांना पोषक ठरणारे असल्याचे सांगितले जाते.

### तापमान आणखी घसरण्याची शक्यता

हवामान विभागाच्या सुत्रानुसार मराठवाड्यात सध्या थंडीची लाट असून नांदेड,हिंगोली आणि लातूर या तिन जिल्ह्यातील तापमानात कमालीची घट झाली असल्याचे दिसून येत आहे. पुढील ४८ तासात या तिन जिल्ह्यातील तापमानात आणखी घसरण होण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.या थंडीच्या बचावासाठी विशेष करून ग्रामिण भागात शेकोटी पेटविल्या जात असल्यातरी शहरात मात्र थंडी पासून बचावाचे पर्यायी साधने उपलब्ध असल्यामुळे शेकोटी फारसी दृष्टीस पडत नाही.

## शुक्रवारनंतर आता मंगळवारच्या आठवडी बाजाराचे स्थलांतर

प्रतिनिधी । नांदेड

शहरातील दैनंदिन वाहतूक आणि रहदारीला अडथळा होवू नये यासाठी तीन मुख्य रस्त्यावर पसरलेला शुक्रवार आठवडी बाजार आता इंदिरा गांधी मैदानावर भरविण्यास सुरुवात झाली आहे. त्याचबरोबर नवीन कौठा भागात दर मंगळवारी मुख्य रस्त्यावर भरणाऱ्या आठवडी बाजारचे आता वसरणी रोडवर स्थलांतर करण्याचा निर्णय घेऊन महापालिका प्रशासनाकडून शेतकरी आणि भाजीपाला विक्रेत्यांना त्याविषयीचे आवाहन करण्यात आले आहे.

शहरातील अण्णाभाऊ साठे चौक ते आयटीआयकडे जाणारा व्हीआयपी मार्ग , शिवाजीनगर ते ज्योति टॉकीज रोड आणि गोकुळनगर ते रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या मार्गावर शुक्रवारचा आठवडी बाजार पसरला असल्यामुळे दैनंदिन वाहतुक व रहदारीस अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहन चालकांसह नागरिकांना अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत होता.यामुळे गोकुळनगर भागातील गजबजलेला शुक्रवारचा आठवडी बाजार आता शहरातील रोड नं.२६ व इंदिरा गांधी मैदानावर भरविण्यात येत आहे.



### साईबाबा कमान ते दुध डेअरी बाजारासाठी

नवीन पुलाच्या पलीकडील साई मंदिर कमानीजवळ मुख्य रस्त्यावर दर मंगळवारी भरणारा आठवडी बाजार वसरणी रोडवर डाव्या बाजूने भरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तरी भाजीपाला विक्रेते आणि शेतकरी यांनी वाहतुक व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही, यासाठी वसरणी रोडवर साईबाबा मंदिराकडे जाणारा रस्ता ते दुध डेअरी पर्यंत रस्त्याच्या डाव्या बाजूला भाजीपाला विक्रीसाठी बसावे,असे आवाहन मनपा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पुर्णा येथील आगीत लाखो रुपयांचे साहित्य खाक

प्रतिनिधी । पुर्णा

शहरात सोमवारी (दि.८) सकाळी साडेदहाच्या सुमारास तहसील कार्यालयाच्या गेटसमोरील दोन कार्यालयांना अचानक आग लागली. या घटनेत विधीज्ञ राजेश भालेराव आणि विधीज्ञ पळसकर यांचे कार्यालय पूर्णतः जळून खाक झाले.

कार्यालयातील संगणक संच, झेरॉक्स मशीन, ऑनलाईन सेवा साहित्य, टेबल, खुर्च्या, फर्निचर, लॅपटॉप यांसह इतर महत्त्वाचे साहित्य जळून खाक झाले. अग्निशमन दलाने तत्काळ पाचारण होऊन बंबच्या साहाय्याने आग नियंत्रणात आणली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र जळालेल्या साहित्यामुळे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून शॉर्टसर्किट झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आगीमुळे दोन्ही कार्यालयांचे नियमित कामकाज तात्पुरते विस्कळीत झाले आहे.

## लोकसहभागातून वनराई बंधाऱ्याची उभारणी

प्रतिनिधी । देगलूर

तालुक्यातील चालुक्य कालीन येरगी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत लोकसहभाग, श्रमदान आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून स्वच्छता व जलसंधारणाचा आदर्श प्रकल्प राबविण्यात आला.ग्राम पंचायत हद्दीतील सामाजिक आवारे, रस्त्याच्या दुतर्फा, शाळा पटांगण, अंगणवाडी, आरोग्य उपकेंद्र आणि इतर सार्वजनिक ठिकाणांमध्ये जनसमृद्ध स्वच्छता अभियान उत्साहात पार पडले.

याचबरोबर हरित गाव उपक्रमांतर्गत पाणी साठवणुकीसाठी गावालगतच्या ओढ्याजवळ वनराई बंधारा उभारण्यात आला. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी व भूजलपातळी वाढविण्यासाठी सर्वाधिक प्रभावी मानल्या जाणाऱ्या या बंधाऱ्याचे काम ग्रामस्थांनी अवघ्या अर्ध्या दिवसात श्रमदानातून पूर्ण केले.गावातील तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन जबाबदारीची जाणीव ठेवत जलसंधारणाचा जिवंत आदर्श घालून दिला.



### भूजल पुनर्भरणाची नैसर्गिक पद्धत

पावसाळ्यानंतर पाणी वेगाने वाहून न जाता जमिनीत झिरपण्यास मदत. स्वस्त, परिणामकारक व समुदायाधारित उपाय, कमी खर्चात मोठा फायदा मिळवून देणारा बंधारा.जैवविविधतेला चालना, वाढलेली आर्द्रता झाडे, वनस्पती आणि परिसरातील जैवसाखळी मजबूत करण्यास मदत हा उद्देश या उपक्रमातून साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## कंत्राटी पदभरतीची मुलाखत लांबणीवर

प्रतिनिधी । नांदेड

नांदेड महानगरपालिका अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना योजनेसाठी शहरस्तरीय तांत्रीक कक्षातील तज्ञांची कंत्राटी म्युनिसिपल सिव्हिल इंजिनिअर आणि टाऊन प्लॅनिंग स्पेशालिस्ट या पदांसाठी प्रत्येकी एका जागेवर एकत्रित वेतनावर / कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी दि.१७ नोव्हेंबर रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यात आली असून या पदाच्या मुलाखती दि.१० डिसेंबर रोजी पालिकेच्या आयुक्त कक्ष येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. तथापि, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका अनुषंगाने बहुतांश अधिकारी आणि कर्मचारी हे सद्या निवडणूक कामात व्यस्त असल्याने, दि.१० डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या कंत्राटी पदाच्या मुलाखती पुढील आदेशापर्यंत पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.त्यामुळे मुलाखती लांबणीवर पडलेल्या या बदलाची सर्व इच्छुक उमेदवारांनी नोंद घ्यावी , असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## जिल्हा परिषद शाळेत येणार पारदर्शकता

प्रतिनिधी । रिठा

स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणात मागे न राहता त्यांच्या सर्वांगीण विकास करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन तत्कालीन शिक्षक, शालेय समिती व गावकरी यांच्या पुढकारातून रिठा येथील जिल्हा परिषद शाळा डिजिटल झाली. त्याच धर्तीवर शाळेत पारदर्शकता यावी म्हणून शालेय सुरक्षा समितीचे सद्यस्य डॉ. प्रभा प्रवीण पाकलवाड यांनी सिसिटीव्ही कॅमेरे भेट दिली.

२०९ विद्यार्थीपट असलेल्या शाळेत ११६ विद्यार्थिनी ९३ विद्यार्थी आहेत यासाठी ९ शिक्षक कार्यरत आहेत.एकूण पटसंख्या असलेल्या पैकी जास्त मुलीची संख्या आहे.शाळेत संगणक, प्रोजेक्टरं ज्ञानरचनावादी शाळा झाल्याने कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच विद्यार्थीना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी या उद्धेशाने डॉ.प्रवीण पाकलवाड व डॉ. प्रभा पाकलवाड यांनी शाळेत मोफत आरोग्य तपासणी, शालेय साहित्य वाटप, असे विविध उपक्रम राबवितात याच आधारावर शालेय सुरक्षा समितीचे सद्यस्य डॉ. प्रभा पाकलवाड यांनी स्वखर्चांनी शाळेत कॅमेरे बसवून दिले.

## संत नामदेवनगरात अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ

प्रतिनिधी । हिंगोली

बळसोंड ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या संत नामदेव नगरामध्ये विघ्नहर्ता गणपती मंदिर या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह संगीत भागवत ज्ञान यज्ञ सोहळ्याला रविवार सात पासून प्रारंभ झाला आहे.

हा सोहळा सात ते १४ डिसेंबर या कालावधीत सुरु राहणार आहे. दरम्यान, सकाळी पाच ते सहा काकडा भजन,आठ ते साडेआठ यजमानाचे हस्ते श्री ची पूजा, दहा ते बारा सामुदायिक नामजप पुरुष व महिला, दुपारी एक ते पाच भागवत कथा, सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ, रात्री आठ ते दहा हरिकीर्तन व नंतर गुणीजनाचा हरी जागर होणार आहे.

मंगळवारी हभप जनाबाई अंगतराव राख आंबेजोगाई यांचे कीर्तन, बुधवारी हभप पांडुरंग महाराज सरकटे संगेकर यांचे कीर्तन, गुरुवारी हभप माऊली महाराज भिमटे आळंदीकर यांचे कीर्तन, १२ डिसेंबर हभप बाबुराव महाराज तडसे पुसदकर यांचे कीर्तन, १३ डिसेंबर हभप जय महाराज सरनाईक रिसोडकर यांचे कीर्तन तर १४ डिसेंबर रोजी सकाळी दहा ते एक हभप सर्वेश महाराज शुक्ल यांचे काल्याचे किर्तन होऊन नंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील भागवत सप्ताहामध्ये सर्व भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्री विघ्नहर्ता मंदिर संत नामदेव नगर, छत्रपतीनगर, अंतूलेनगर पंढरपूर नगर, आनंदनगर ,शिक्षक कॉलनी , रामाकृष्णा नगर बळसोंड येथील भक्तांनी केले आहे.

## तालुका खरेदी विक्री संघात सोयाबीन खरेदीचा शुभारंभ

प्रतिनिधी । हदगाव

केंद्र शासनाच्या हमीभाव खरेदी योजनेअंतर्गत हमीदराप्रमाणे सोयाबीनचे खरेदी केंद्र हदगांव तालुका सहकारी खरेदी विक्री संघ येथे सुरू करण्यात आले आहे. आज सहाय्यक निबंधक गनलेवार यांच्या हस्ते व खरेदी विक्री संघाच्या संचालक मंडळाच्या उपस्थितीत रीतसर काटा पूजन करून खरेदीला सुरुवात करण्यात आली.

मुहूर्ताच्या खरेदीला तळेगाव येथील शेतकरी भगवान दिगंबर शिंदे यांचे सोयाबीन खरेदी करताना त्यांचा सहाय्यक निबंधक गणलेवार यांचे हस्ते शाल श्रीफळ व दस्ती टोपी देऊन सत्कार करून करण्यात आला. आतापर्यंत हदगाव तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाकडे अडीच हजार शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब शिंदे, उपाध्यक्ष विनायकराव कदम, संचालक प्रभाकरराव पत्तेवार, बळीरामजी देवकते, सुभाष राठोड, धनंजय शिंदे, परमेश्वर गोपतवाड, शेषराव पाटील सूर्यवंशी, यशवंत कडबे, सुदर्शन भरती, संजय कवडे, गणेशराव तावडे, डॉ. सुरेश जाधव, सुभाषराव पवार, रत्नाकर जांबुतकर, संस्थेचे सचिव बालाजी हराळे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच सोयाबीनची सुरुवातीला दोन चाळण्याची व्यवस्था करण्यात आली असून ज्या प्रमाणात आवक वाढेल त्या प्रमाणात चाळण्याची व्यवस्था करण्यात येईल असे संचालक मंडळाने सांगितले. सध्या सर्वत्र बारदाना म्हणजेच रिकामे पोते जिल्ह्यामध्ये कोणत्याही खरेदी केंद्रावर उपलब्ध नाहीत. परंतु हदगांव तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या संचालक तथा पणन महासंघाचे प्रतिनिधी प्रभाकरराव पत्तेवार यांनी आठ हजार बारदाना उपलब्ध करून दिला आहे. लवकरच ग्रेडरची नियुक्ती करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. दरवर्षी नांदेड आणि वसमत येथे खरेदी केलेले सोयाबीन साठवणूक करण्यासाठी नेऊन टाकावे लागत असे. त्यासाठी संस्थेकडे पुरेसा निधी उपलब्ध करावा लागताना तारेवरची कसरत करावी लागत होती. यावर्षी हदगांव तालुक्यातील तामसा आणि हदगाव येथील सरकारी गोदामात माल साठवण्यासाठी व्यवस्था उपलब्ध झाली आहे.



### शेतकऱ्यांना आवाहन

शासनाच्या पोर्टलवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनी खरेदीसाठी मॅसेज आल्यावर पाच दिवसांपर्यंत आपले सोयाबीन खरेदी केंद्रावर घेऊन यावे किंवा काही अडचण आली असल्यास संस्थेच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आवाहन हदगांव तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळाने केले.

## कापूस खरेदीत आर्थिक लूट कराल तर खबरदार ;उपसभापतींचा इशारा

प्रतिनिधी । तामसा

येथील नटराज जिनिंग फॅक्टरीमध्ये सुरू असलेल्या शासकीय कापूस खरेदी केंद्रावर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्याकडून शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारी वाढल्याने बाजार समितीचे उपसभापती तातेराव पाटील यांनी सोमवारी कापूस खरेदी केंद्राला भेट देऊन शेतकऱ्यांची आर्थिक लूट करणाऱ्या कर्मचाऱ्यांची चांगलीच कानउघडणी केली.

शेतकरी कापूस विक्रीसाठी शासकीय कापूस खरेदी केंद्रावर आणत आहेत. परंतु कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्याकडून शेतकऱ्यांची आर्थिक लूट करीत त्रास देत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. याबाबत शेतकऱ्यांनी उपसभापती तातेराव पाटील यांच्या कानावर घातले असता त्याची दखल घेऊन त्यांनी सोमवारी अचानक भेट देऊन झाडाझडती घेतली. उपस्थित अनेक शेतकऱ्यांनी कापूस नोंदणी करणे, अप्रोर काढणे, भाव फरक देणे, शेतकऱ्यांना उद्धटपणाची वागणूक देणे, दीड दीड हजार रुपयांची आर्थिक लूट केल्याचे अनेक प्रकार सांगितल्याने संतापलेल्या उपसभापती तातेराव पाटील यांनी शेतकऱ्यांची आर्थिक लूट करणाऱ्या कर्मचाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले.

विशेष म्हणजे तामसा येथील व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्याच्या शेतीमालाची लाखो रुपयाची खरेदी विक्री कच्च्या पावत्यावरच होत असल्याचा प्रकार शेतकऱ्यांनी उघड केल्यानंतर उपसभापती तातेराव पाटील यांनी बाजार समितीचे सचिव किशोर वानखेडे यांना या प्रकारावर तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना देऊन बाजार समितीचे बिल बुक व्यापाऱ्यांना का दिले जात नाही? याबद्दल जाब विचारला. त्यावेळी सचिव वानखेडे यांनी छापील बिल बुक प्रत्येक व्यापाऱ्यांना दिले आहेत.

मात्र व्यापारी त्याचा वापर करीत नसल्याचे सांगितले. शेतीमालाची कच्च्या पावत्यावरच खरेदी विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर कारवाई करणार असल्याचे शेवटी उपसभापती तातेराव पाटील यांनी सांगितले. यावेळी ग्रेडर संजय खोडके, सचिव किशोर वानखेडे, कर्मचारी अरविंद राठोड, उत्तम भिसे, बदरवाड, राजाराम अमृतेसह अनेक शेतकरी उपस्थित होते.

**संघर्ष** मनरेगामध्ये जबाबदारी निश्चित करण्यासाठी जिल्हा परिषदे समोर लढा

# राजपत्रित अधिकाऱ्यांचे काम बंद आंदोलन सुरू

प्रतिनिधी । नांदेड

शासकिय घरकुल व मनरेगा योजनांमध्ये जबाबदारी निश्चित करण्याची मागणी मान्य न झाल्याने महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेच्या जिल्हा शाखेच्यावतीने सोमवार (दि.८) पासून सामूहिक रजा घेऊन काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. दरम्यान, या आंदोलनात जिल्हा परिषदेचे जवळपास सर्वच विभागप्रमुख सहभागी झाले असल्याने प्रशासकीय कामकाजाचा खोळंबा झाला असल्याचे दिसून येत आहे.

यानिमित्ताने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की,आर्वी येथील पंचायत समिती कार्यालयातील मनरेगाच्या कथित गैरव्यवहार प्रकरणात कुठलीही प्राथमिक चौकशी न करता गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांना झालेली अटकेची कारवाई अन्यायकारक आहे.तसेच याप्रकरणी लेखी निवेदनाद्वारे विनंती करूनही मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री व रोहयो मंत्री यांच्या बैठकीत समाधानकारक निर्णय अद्यापही घेण्यात आलेला नाही. त्यामुळे राजपत्रित अधिकारी संघटनेच्यावतीने नांदेडसह राज्यभर कामबंद आंदोलन करण्यात येत असून न्याय मागण्या मान्य होणार नाहीत, तोपर्यंत सामूहिक रजा आंदोलन सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा संघटनेचे अध्यक्ष संदीप मोळोदे यांच्या नेतृत्वाखाली आज सोमवारी करण्यात आलेल्या आंदोलनात प्रकल्प अधिकारी डॉ.संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार ,उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी.बी.गिरी,अमित राठोड, ज्ञानेश्वर टाकरस, अभय नलावडे,प्रसिध्दी प्रमुख श्रीकांत बलदे, उमाकांत तोटावाड यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



### अभ्यागतांची मोठी गैरसोय

या आंदोलनात जिल्हा परिषदेचे जवळपास सर्वच विभागप्रमुख आणि अधिकारी सहभागी झाले असल्याने प्रशासकीय कामकाजाचा खोळंबा झाला असल्याने कामानिमित्ताने दूरवरून आलेल्या अभ्यंगतांची मात्र मोठी गैरसोय झाली असून त्यांना नाहक मनस्ताप आणि आर्थिक भुर्दड सहन करावा लागत असल्याचे चित्र आज पहावयास मिळाले.या आंदोलनामुळे होणारी अभ्यागतांची गैरसोय दुर करावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## राहुल येरगे हत्याप्रकरणी आंबुलगा ग्रामस्थांचे धरणे

प्रतिनिधी । मुखेड

तालुक्यातील आंबुलगा येथील बारावीत शिक्षण घेणाऱ्या राहुल येरगे या विद्यार्थ्याच्या निर्घृण हत्येप्रकरणी आंबुलगा येथील ग्रामस्थांनी आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा व्हावी, या मागणीसाठी ६ डिसेंबरपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.

३ डिसेंबर रोजी राजुरा येथील खंडोबा यात्रेदरम्यान सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास राहुल आपल्या मित्रासोबत यात्रेत फिरत असताना, जुन्या वादातून त्याच्याच वर्गातील काही विद्यार्थ्यांनी त्याला अडवले. यावेळी धारदार शस्त्राने (खंजरने) वार केल्याने राहुलचा जागीच मृत्यू झाला.जमिनीवर पडलेल्या राहुलला त्याच्या मित्रांनी तातडीने मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

या घटनेमुळे सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. ४ डिसेंबर रोजी दुपारी राहुलच्या पार्थिवाचे शवविच्छेदन करून रात्री उशिरा आंबुलगा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

अंत्यसंस्कारानंतर आंबुलगा गावातील ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी राहुलला श्रद्धांजली अर्पण करत या घटनेचा तीव्र निषेध केला. गावातील बसस्थानक परिसरात त्यांनी ६ डिसेंबर पासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.